

म ग्रं सं वाचनालय शाखा ठाणे
विषय नाटक
दा क्र ७३५
IRBK-0100735
IRBK-0100735

दकिशोर—या नखांनीं ललितागौरीचं नरडं फोडून... [अंक १ प्र. ३].

सं० ९५ · ५३५

१४८०१
अक्रम/३१५३
विभाग ना
क्रमांक ५०८
नौ. कि.
...नालय

# संगीत अग्रहार

( तीन अंकी नाटक. )

अनुक्रम
विभाग ना.
क्रमांक
नों. दि.

लेखक.

संगीत अघोर तृष्णा, हाच परिणाम, नवजीवन,
भक्तिप्रभाव, वन्देमातरम्, भाऊसाहेब
इत्यादि नाटकांचा कर्ता

**कृ. ना. अस्नोडकर.**

—×—×—

प्रकाशक
नरहर रामचंद्र जोशी.

१९२६

( नाटकाचे सर्व प्रकारचे हक्क पुस्तककर्त्याच्या स्वाधीन. )

मुंबई.

IRBK-0100735

किंमत एक रुपया.

मुद्रक:—केशव गणेश जोशी
श्रीरामदास प्रिन्टिंग प्रेस,
खटाव मकनजींची वाडी, मुंबई, नं. ४.

प्रकाशक:—नरहर रामचंद्र जोशी
श्रीरामदास प्रीन्टिंग प्रेस,
गिरगांव—मुंबई.

# जादा पदें.

## अंक २ रा प्रवेश १ ला.

विमलादेवी—आर्तस्वर माझें हृदय फाडीत आहे.

पद ( रागरागेश्वरी—त्रिताला. )

दु:खभारा हराया दुरोया । व्याकुल
काया स्वजनाहिता त्या ।। धृ० ।। अहर्निश
चिंती पाया प्रभुच्या तेंवी न्याया ।
जनिच्या भया ।। १ ।।

—×—

## अंक २ रा प्रवेश ३ रा.

शामकुंवर—अनुराग का निमाला या पदाऐवजीं.

पद ( कॉफी—कवाली )

त्यागि सुधा छाया । शशि का बला ।। धृ० ।।
सृष्टिदेवता रवितेजानें जाइल विलया
कधिं का काला । विखरत नगनाला ।। १ ।।
दीन लीन मी अपुली छाया । चुकलें कधिं का
या तव पाया । विचलित वचनाला ।। २ ।।

—×—

# आभार

ललितप्रभा संगीत मंडळीनें हें नाटक आस्थेनें स्टेजवर आणून नटवर्गानीं त्या त्या प्रसंगाचीं छायाचित्रें दिल्याबद्दल कंपनीचा व नटवर्गाचा मी फार आभारी आहें. त्याचप्रमाणें फोटोग्राफर श्री. बाळकृष्ण विठ्ठल सुवार पेढणें ( गोंवा ) यांनीं स्टुडिओ नसतां अत्यंत परिश्रमानें फोटो काढून दिल्याबद्दल त्यांचाहि मी फार आभारी आहे. हें नाटक पुस्तकरूपानें पुढें आणण्याचें सर्व श्रेय माझे मित्र व प्रकाशक नरहर रामचंद्र जोशी यांना आहे माझ्या इतर नाटकांप्रमाणें हेंहि नाटक लोकांच्या आदराला पात्र झाल्यास माझ्या श्रमाचें सार्थक झालें असें समजेन.

मुंबई ता. १–४–२६

सर्वांचा नम्र,

कृ. ना अस्नोडकर.

अ. के. सं. वि. वाचनालय
ग्रं. क्र. ६०३५
दि. ०७/१८६
अनुक्रम ९४८०९
विभाग ०७
क्रमांक ८०८
नों. दि. ३०।३।५७

# अग्रहार.

## अंक पहिला.

### प्रवेश १ ला—राजमहाल.

( ललितागौरी बसली आहे. नाच चालला आहे. )

मुली—

१ पद ( यमन—त्रिवट. )

नमन प्रथम सविनय गुरू जनांस । गाऊं विमल प्रभुवर गुणास ॥ ध्रृ० ॥ ललित—शारदा विद्या—वरदा । स्मरतां धांवुनी समया येई । विहरत जय विजया ॥ १ ॥ सुजन तारका राष्ट्रोद्धारा । विलसो भारती विलया न्याया । खर तर खल समया ॥ २ ॥

( मुलींचा नाच )

२ पद ( धानी—त्रिवट. )

गाऊं नाचूं सखिया । प्रियजन-हृदया तोषवुया ॥ करिं गुंफुनिया शुभसमया माला नट नाट्यमया ॥ ध्रृ. ॥ नाद मधुर भान हारि । स्थिरचर हाले मोद भारि । झाला शंकर भोला । वश शबरी मधु बोला । ठुमकत मुरडत हरपत तनमन अभिनव नारी ॥ १ ॥

ललिता—( त्वेषानें ) आम्हा सुंदर स्त्रियांच्या दृष्टींत पुरुषांना घायाळ करणारं किती जालीम जहर भरलं आहे ! कट्यारीच्या तिक्ष्ण वारानं भेदून

न जाणारं शूराचं हृदय आमच्या नजरेच्या एका - फेंकीनं छिन्न विछिन्न होतं ! दुष्मानांच्या नरड्यांतील रक्त चोखण्या करतां स्फुरण पावणारे ओष्ट आमच्या अधरांतील रस लुटण्याकरतां बेदिल् होतात !—ही ललितागौरी, ही अस्मान तारा, ही आतष पुतळी राणा वीरेंद्रसिंहाची रखेली ! राणाजी, माझ्या लावण्याची आग तुमच्या कलेजांत भडकतांच तुमची दगाबाज कट्यार माझ्या पतीच्या कलेजांत बेगुमान घुसली आणि तुह्मी मला आपली रखेली केलीत ! पण नागिणीची छेड काढतांना तिच्या जालीम जहराची लहर नाहीं ओळखलीत ! तुम्हाला वाटलं ही एका हुजऱ्याची स्त्री ! तिला कसली आली आहे इज्जत ! पण स्त्रीजात अस्सल असो कीं कमअस्सल असो, दिसायला जितकी ती कमकुवत तितकीच ती आपल्या इज्जतीचा सूड घ्यायला बेमुरवत ! ज्या दिवशीं तुह्मीं माझ्या गोषांत घुसून मला इज्जतीच्या तक्तावरून खालीं खेचलीत त्याच दिवशीं तुम्हालाहि चितोडच्या तक्ताखालीं चुरडीन अशी घोर प्रतिज्ञा केली. माझ्या पतीच्या सूडाचा बदला घेतांना, प्रत्यक्ष काळ जरी आकाश फाडून माझ्यावर आपली क्रूर नजर रोखूं लागला तरी ही ललितागौरी लवमात्र डगमगणार नाहीं.—नादान् ! माझ्या लावण्याचं जहर तुझ्या नसांनसांतून इतकं भिनून गेलं आहे कीं, आतां मी नाचवीन तसा तूं नाचशील, पण फाजील विश्वास कामाचा नाहीं. माझा दुष्मन, तो थेरडा शिवशर्मा, राणी विमलादेवीला हातीं धरून माझा डाव हाणून पाडण्याचा अट्टाहास करीत आहे. त्याचे वेळींच पाय तोडले नाहींत तर हे लोक मला फाडफाडून खातील.

( हाजिसिंग येतो. )

हाजि०—हांSSSजी !

ललिता०—कोण हाजिसिंग ? कांहीं नवी खबर ?

हाजि०—हांSSजी ! नव्या खबरांचा तर जबरा काळ आला आहे. कोनाकोपऱ्यांत जा कीं भर चव्हाट्याकडे कान लावा, आपणासंबंधीं-

एखादातरी शब्द ऐकूं आला नाहीं असं विरळाच. पण आपण कशाला कोणाची निंदा करा !

ललिता०—नादान् लोक असं बोलतात तरी काय ? हाजिसिंग ?

हाजि०—हांऽऽजी !

ललिता०—तुम्ही जातिनिशी खात्री करून घेतली आहे का ?

हाजि०—हांजी !

ललिता०—तर मग त्यांचे चांगलेच दांत पाडले पाहिजेत.

हाजि०—हांजी. करंगळी सुजली म्हणून डोंगरा एवढी होत नाहीं. पण आपण कशाला कोणाची निंदा करा.

ललिता०—बरं, पण त्यांचं असं म्हणणं तरी काय आहे ?

हाजि०—कसलं ह्मणणं ! भरले पोटा अंजिर कडू. प्रजेच्या सुखाकरतां जस जशा आपण नव्या नव्या सुधारणा राणाजींना सुचवूं लागला तसतशी लोकांना अधिक हांव सुटत चालली आहे. लबाड कारभाऱ्यांची झोळी भरत नसल्यामुळें ते बावचळल्यासारखे बरळत सुटले आहेत. पण जाऊं द्या आपण कशाला कोणाची निंदा करा ! बाकी आमच्या ललितागौरीसाहेब किती धोरणी, किती मुत्सद्दी, किती दयावंत—हांजी—किती कृपाशील—

ललिता०—( रागानें ) बस्स करा तुमचे स्तुतिपाठ !

हाजि०—हांजी !

ललिता०—माझ्या निंदेचे पाठ घोकणारांच्या आधीं मला पाळी खोलून काढून द्या. हाजिसिंग ?

हाजि०—हांजी.

ललिता०—या ललितागौरीचा तुम्हाला अभिमान आहे ना ?

हाजि०—हांजी, हा श्वास, हीं हाडं, हे स्नायू—

ललिता०—ह्मणजे ?

हाजि०—हांजी, हा भाषेचा अलंकार आहे.

ललिता०—पुरे करा असला हाडामांसाचा अलंकार.

हाजि०—हांजी.

ललिता०—मी बाह्यदृष्टीला जरी परकी आहे तरी राणाजींच्या प्रेमानं अंकित केलेली त्यांची अर्धांगीच नव्हे का ?

हाजि०—हातच्या कांकणाला आरसा नको आहे!

ललिता०—एका काळीं विमलादेवीच्या बापानं राणाजींच्या मागणीचा अव्हेर केला म्हणून त्याच्यावर स्वारी करून राणाजींनीं त्याच्या सत्तेचा नायनाट केला व अपमानाचा सूड घेण्याकरतांच विमलादेवीबरोबर विवाह लाऊन तिचा त्याग केला पण त्याच वेळीं माझा स्वीकार केला यांत माझी काय कसूर ?

हाजि०—हांजी, भित्याच्या पाठीस ब्रह्मराक्षस!

ललिता०—प्रजेच्या सुखाकरतांच अधिकारी मंडळांत थोड्या सुधारणा मी राणाजींना सुचविल्या पण तो थेरडा शिवशर्मा माझ्या सदिच्छेचा विपर्यास करून लोकमत कलुषित करीत आहे. विमलादेवीवर आपल्या जादूचा फुत्कार टाकून त्यानें तिला पित्याच्या सूडाला प्रवृत्त केली आहे. राणाजींचे कनिष्ट बंधू चंद्रकिशोर त्यालाही त्या थेरड्यानें पूर्ण बगलेंत धरला आहे.

हाजि०—हांजी, काडी चोर तो पाडी चोर!

ललिता०—मग सांगा, डोळ्यांत तेल घालून मला नको का त्या भोळ्या सांबावर जागता पहारा ठेवायला ?

हाजि०—हांजी, हजीर तो वजीर!

ललिता०—झालं तर मग, तुम्ही विमला देवीच्या वाड्यांत वरचेवर जात येत रहा, कोणाला संशय येणार नाहीं असं वर्तन ठेवा, शामकुवरलाहि थोडी शिकवण द्या. माझ्या विरुद्ध मत देत रहा आणि तिकडे काय काय

हालचाली घडतात, त्या झटकन् माझ्या कानावर टाकीत जा. या कामगिरीबद्दल तुह्मांला जहागिरी बक्षल करीन.

हाजि०—हांजी, काडीची सत्ता आणि लाखाची मत्ता बरोबर होत नाहीं! हुजूरांनीं बेफिकीर रहावं.

ललिता०—जा तर, लागा कार्याला.

हाजि०—हांजी, बाकी आपण कशाला कोणाची निंदा करा!

( जातो. )

ललिता०—शिवशर्म्या, विमलादेवीला हातीं धरून तूं किती जरी डाव रचलेस तरी या ललितागौरीच्या रागाचा एकच फुत्कार तुझ्या हृदयाला अंगार लावील. आज राणाजींना खुलवून असा कांहीं डाव साधते कीं या ललितागौरीची करामत पाहून तो अखिल विश्वाचा सूत्रधार देखील तोंडांत बोटंच घालील कमल !—

( दासी येते. )

कमल०—जी सरकार.

ललिता०—कमल, आज शृंगार चढवायचा नाहीं का ?

कमल०—शृंगाराचा आज कंटाळा आला आहे असं आपणच ह्मणाला होतात मग माझी काय कसूर ?

ललिता०—शृंगारशास्त्र तुला काय कळणार ! वेडे, आपल्या खुबसुरतीवर प्रियकर कितीजरी बेहोष झाला असला तरी कोणत्या तरुणीला आपली छबी शृंगारल्यावांचून रहावेल ?

कमल०—पण जातीवंत सौंदर्याला नकली साधनांची काय जरूरत ! चंद्राचा प्रकाश दाखवायला दिवटी का पेटवावी लागते ?

ललिता०—तो गगनतारा प्रकाशाचा जरी सांठा असला तरी सभोंवार लुकलुकणाऱ्या नक्षत्र मंडळानं त्याला विशेष शोभा आलेली असते. कमल, राणाजी माझ्या सौंदर्याचं गीत आळवीत मला स्वर्गसुंदरी ह्मणतात खरंच काग मी इतकी सुंदर आहे ?

**कमल०**—हें सांगायला देवलोकीचा एखादा चित्रकार का बोलावला पाहिजे ? आपल्या सौंदर्याच्या मत्सरानें दुष्मनांचा भडका उडविला आहे. राणाजी तर आपल्या सौंदर्याचे बंदे गुलाम बनले आहेत. आपल्या एका शब्दाकरतां आपल्या तक्तावरही पाणी सोडायला तयार आहेस.

**ललिता०**—असतील ! माझ्या सौंदर्याला आपलं तक्त बहाल करायला तयार असतील पण मला तें माझ्या लाडक्या अजिताला बहाल करायचं आहे; तेव्हां सौंदर्याच्या फाजील ताठ्यावर बेफिकीर असतां कामा नये. जा, शृंगारसाहित्य घेऊन ये. ( दासी जाऊं लागते. ) अग, पण थांब ! रोज पंचपक्वान्नांचा आस्वाद घेतांना रुचिपालट केल्यावांचून जशी लज्जत येत नसते तसे आज ते जड जवाहिराचे अलंकार नकोत. कोमल फुलांच्या अलंकारांनींच आज मी फुलांची राणी बनणार.

**कमल०**—मग सुगंधित फुलांचे हार तयार आहेत.

**ललिता०**—आण तर ते इकडे. ( कमल पुष्पहार आणते व ललिता-गौरीच्या अंगावर चढविते. ) अहा, या नाजूक फुलांत किती अजब मोहिनी भरली आहे ? यांच्या स्पर्शानें माझ्यासारखी स्त्री जर इतकी दिवाणी बनते तर या नाजुक वक्षस्थळावर लोळत असलेले हे पुष्पहार पाहून राणाजींची काय अवस्था होईल ?

---

( वीरेंद्रसिंह येतो. दासी जाते. )

**वीरें०**—बाहुपाशांत कधीं चुरडीन असंच होईल,

**ललिता०**—( लज्जेचा आविर्भाव आणून ) जा, गडे, असं अवचित येणं मला नाहीं खपत.

**वीरें०**—ललिता, आजिंक्य पुष्पबाणांनीं आज कोणत्या महाभागाचं अंतःकरण विव्हल करायचं योजलं आहेस ? ही स्वर्गसुंदरी आज कोणत्या भाग्यवंताला धन्य करणार आहे ?

**ललिता०**—राजेसाहेब, ही ललितागौरी या पायाची बटीक, बंदीगुलाम पण तिला आज आपण केवढ्या थोर तक्तावर बसवली आहांत ! प्यारे, आपली ही मेहरनजर अशीच कायम राहील ना ?

**वीरें०**—ललिता, हा वीरेंद्रसिंह चितोडचा जरी सत्ताधीश असला तरी प्यारी ललितागौरीचा बंदा गुलाम आहे. प्यारी, आज राजकीय कुलाचाराचा वार्षिक समारंभ पण माझ्या भार्यावृंदांच्या रोषातोषाची पर्वा न करतां, जनापवादाला न जुमानतां या अस्मानपरीच्या प्रेमरसाकरतां चातकासारखा धांवत आलों या वरून तरी माझ्या प्रेमाची नाहीं का तुला पारख होत ?

**ललिता०**—ती कशी होणार नाहीं ? पण किती झालें तरी मी आपली रखेली ! फुलांतील रस निघून गेल्यावर त्याची कोण कदर राखणार ?

**वीरें०**—ललिता, भलताच कल्पनांनीं माझें हृदय छिन्न नकोस-लौकिक दृष्टीनें जरी आपल्याला विवाहबद्ध होतां आलं नाहीं तरी प्रेमाच्या शुद्ध स्वरूपांत हे दोन जीव एकजीव झाले आहेत. या वीरेंद्रसिंहाच्या देहाची, व्यवसायाची, सत्वाची चैतन्यशक्ति एक प्यारी ललिता गौरीच आहे.

**ललिता०**—आपले चरण साक्ष ठेऊन सांगते कीं, आपल्या प्रेमाविषयीं मला बिलकूल शंका नाहीं पण—

**वीरें०**—पण काय ? ललिता, काय असेल तें स्पष्ट बोल. या माझ्या हृदयदेवतेला दुःखाची नुसती कल्पनाहि शिवलेली मला सहन होणार नाहीं.

**ललिता०**—राणाजी, प्रसंग आल्यास माझ्याकरतां काय वाटेल तें कराल ना ? विमलादेवीसारखा माझा त्याग तर करणार नाहीं ना ?

**वीरें०**—किती तूं भोळी ! ललिता, जी जनता या वीरेंद्रसिंहाला आपला प्राण समजत होती तीच आज तुझ्यामुळें टीकेचा भडिमार करीत आहे, पण हा वीरेंद्रसिंह या माझ्या प्रेमसुंदरीकरतां त्या जनतेला कसपटा-

समान ठेवीत आहे. इमानें इतबारें सेवा केलेले गादीचे निस्सीम सरदार पण माझ्या ललितागौरीच्या आज्ञेबरहुकूम बडतर्फ होत आहेत. मग सांग याहून माझ्या प्रेमाची आणखी कोणती कसोटी पहावयाची आहे ?

**ललिता**०—पण हें उसनें ऐश्वर्य किती दिवस टिकणार ? आणि माझी कदर तरी कोण राखणार ?

**वीरें**०—ती न राखण्याची आज कोणाच्या मनगटांत ताकद आहे ?

( अजित येतो. )

**अजि**०—( रागानें ) पंडित शिवशर्माजीच्या !

**ललिता**०—बेटा काय झालं आणि तुझे कोवळे ओंठ रागानें कांपत का आहेत ?

**वीरें**०—अजित, खेळांत कोणी अपमान तर केला नाहीं ना ?

**अजि**०—खेळांत अपमान करणाराला अजिताच्या या छोट्या तलवारीचं पाणीच कळलं असतं !

३ पद ( शंकरा—एकताला. )

**सहज कसा साहिन मग मानभंग या हातें ।**
**बाल न हा काल खरा नसें भयदसें मातें ॥ धृ० ॥**
**विजयीं मम खडगें या शासिन अरि सहजीं ।**
**शूर वीर प्रबल धीर मी बलधर समरातें ॥ १ ॥**

पण जिकडे या तलवारीचं पाणीच नाहींसं झालं तिकडे हा अजित काय करणार बाप्पाजी ?

**ललिता**०—ह्मणजे ?

**अजित**०—माताजी, मी राजकुमार, बाप्पाजींचा लाडका पुत्र, गादीचा भावी अधिपति अशा भूलथापा देऊन आजपर्यंत चांगलीच फसवणूक केलीस पण आज खरा प्रकार बाहेर पडला !

**ललिता**०—तो काय ?

अनुक्रम ....... ९
विभाग ..........

अजित—ठाकुरजी मला तलवारीचे हात शिकवीत होते, इतक्यांत एकलिंगजीच्या मंदिरांत वाद्यें वाजूं लागलीं म्हणून ठाकुरजींना मी प्रश्न केला तों आज राजकीय कुलाचाराचा मंदिरांत वार्षिकोत्सव आहे असें ते म्हणाले. तेव्हां मला मंदिरांत न्यायला मी त्यांना सांगूं लागलों पण ते कांहींतरी माझी समजूत करूं लागले, तेव्हां रागानें मी एकटाच धांवत मंदिरांत गेलों व बाप्पाजीकरतां मांडलेल्या आसनावर बसूं लागलों तोंच ' रखेली पोराला बाहेर काढा, बाहेर काढा ' असा लोकांचा एकच कल्ला सुरू झाला.

वीरें०—अजित, माझ्या आज्ञेवांचून तूं गेलास कसा !

ललिता०—थांबा ! पुढं काय झालं बेटा ?

अजित—माताजी, पंडित शिवशर्माजींनीं माझा हात धरून मला मंदिराबाहेर नेलं आणि म्हटलं ' अजित, तूं रखेली पुत्र आहेस. या आसनावर बसण्याचा तुला अधिकार नाहीं. ' माताजी, खरंच का मी रखेली पुत्र आहे ? राजासनाचा मला खराच का हक्क नाहीं ?

ललिता०—ऐका, आपल्या लाडक्या पुत्राचे हे धिंडवडे ऐका.

वीरें०—यांत कसले धिंडवडे ? हा कुलाचाराचा प्रश्न आहे तो त्यांनीं अजितला समजावून सांगितला यांत त्यांचा काय गुन्हा ?

ललिता०—काय गुन्हा ? उद्यां माझ्या अजिताची गर्दन छाटून या ललितागौरीची सालटीं सोलून काढलीं तरी तो आपल्याला कसा गुन्हा वाटणार ! कारण मी आपली रखेली ! तिला कसला आला आहे कुलाचार ?

वीरें०—ललिता, तूं मला कितीजरी प्रिय असलीस तरी माझ्या प्रजेला परकीच आहेस. राजकीय कुलाचार ते कसा भ्रष्ट करूं देतील ?

ललिता०—एकूण माझ्या इज्जतीपेक्षां आपल्याला कुलाचाराचीच चाड विशेष आहे तर ? शाबास, राणाजी आजपर्यंत खोट्या प्रेमाचा आव आणून एका भोळ्या स्त्रीला चांगलीच हवेंत झुलवलीत

वीरें०—ललिता, हा धर्माधर्माचा प्रश्न आहे. हा वीरेंद्र जितका तुझा बंदा गुलाम आहे तितकाच तो धर्मबंधनांनीं जखडला आहे. धर्मकृत्यांत त्याला एका काडीचीहि ढवळाढवळ करतां येत नाहीं.

ललिता०—काय, आपल्या पवित्र रक्ताच्या बीजाला धर्माची आड-काठी ? राजे वीरेंद्रसिंहाच्या छाव्याला हक्काची चोरी ? बोला, राजेसाहेब बोला, ही ललितागौरी आपल्या कलिजाचा कलिजा ना ? मग हिच्या अप-मानाची नाहीं का आपल्याला चाड ?

वीरें०—ती एक तो एकलिंगजीच जाणत आहे.

ललिता०—मग चला तर, या आपल्या लाडक्या अजिताला, आपल्या छाव्याला, प्रेमाच्या या अंकुराला युवराजपदाचा अभिषेक करून कुलाचा-राला हक्कदार करा.

वीरें०—ललिता, हें काय सांगत आहेस ! रजपूतांच्या सत्वाची तुला जाणीव नाहीं काय ?

ललिता०—ती आहे ह्मणूनच आपल्या सत्वाची मला परीक्षा पहाव-याची आहे. का, राजेसाहेब तोंड का फिरविलंत ? या ललितागौरीचे आपण बंदे गुलाम ना ? मग तिचा हुकूम आपल्याला मानलाच पाहिजे.

वीरें०—नको, ललिता असा कांहींतरी अविचार करू नकोस. मी जरी या चितोडचा सत्ताधिश असलो तरी धर्माश्रमावर माझी काडीचीहि सत्ता नाहीं. तो लोकपक्षाच्या हातीं आहे. माझ्या अजित करतां दुसरी काय वाटेल ती आज्ञा कर. मोठ्या आनंदानें पाळतों.

ललिता०—नाहीं ! माझा अजित आपल्या कुलाचाराला हक्कदार वारस झालाच पाहिजे.

वीरें०—पण त्या बरोबर माझी धर्मनिष्ठ प्रजा माझ्यावर शस्त्र धरील ! माझ्या सत्तेचा धुव्वा उडवील ! प्रसंगीं मला फाडफाडून खाईल !

ललिता०—मग कट्यारीची धार बोथट झाली कीं काय ? चितोडचा हा नरकेसरी मलुल झाला काय ? राणाजी, तुमच्या कट्यारीचं पाणी जरी सरलं असलं तरी या ललितागौरीची कट्यार अजून गंजली नाहीं. वेळ आल्यास नाजूक हातांत काय करामत असते ती अलम दुनियेला दाखवीन पण इज्जतीची जखम भरून निघालीच पाहिजे.

वीरें०—ललिता—

ललिता०—चूप ! एका परस्त्रीच्या लावण्याला बेहोष होऊन तिच्या पतीचा खून !

वीरें०—नको नको, ती आठवण देऊन माझं हृदय फाडूं नकोस !

ललिता०—तर मग माझा अजित हक्कदार वारस झालाच पाहिजे.

वीरें०—पण प्यारी !

ललिता०—खबरदार ! दुसऱ्याच्या इज्जतीची ज्याला चाड नाहीं त्या ढोंग्याच्या प्रेमाचा मी धिक्कार करतें ! बेटा अजित, चल ! असल्या दगाखोराचा आपल्याला एक पळभरहि सहवास नको.

( जाऊं लागते. )

वीरें०—( तिचा हात धरून ) थांब, ललिता थांब ! देहांतील चैतन्य निघून गेल्यावर या वीरेंद्रसिंहाचा जड देह काय करायचा आहे ? तुझी आज्ञा—

( पडदा पडतो. )

## प्रवेश २ रा—खोली.

( हाजिसिंग येतो. )

हाजि—आजकाल मलिदा झोडायचा असेल तर तो दुरंगीं वर्तनांत रेलचेल साधतो असं मी छातीठोक जगजाहीर करतों. दोन दगडीवर हात ठेवणाराची हातोटी बोथट ठरते असा बोथट सिद्धांत प्रचारांत बोकळत असतो पण माझा मिठ्ठा अनुभव सदासर्वदा मिठाईच चारतो. हा हाजिसिंग धोरण पाहून तोरण बांधतों ह्मणून सर्व कालीं सर्वठायीं फत्तेशायी गाजवितो. ललितागौरी, राणाजींच्या पदरच्या एका हुजऱ्याची स्त्री पण काय तिच्या सद्दीचा जोर! नाहीं तर आमच्या विमलादेवी? चोराला मलिदा आणि धन्याला धत्तूरा! एक चेतवलेली आग तर दुसरी शीतल बाग! पण मी आपला वेळ पाहून खेळ करतो आणि मेळ बसवितो नाहींपेक्षां माझेहि हेल बाहेर पडते. ललितागौरीच्या नादानं राणाजींनीं सारासार विचारांना नादारी दाखविल्यामुळें प्रजा कुत्र्यासारखी पिसाळली आहे पण मी आपला उभय मंडपाचा वऱ्हाडी रीला री ओढतो आणि वेळ निभावतो. मग कोणी चढो कीं पडो येनकेन प्रकारेण आपला स्वार्थ घडो. हो, या थोरामोठ्यांच्या टकरा आपण धोरण पाहून दुरूनच पहात टाळ्या पिटाव्यात तरच खरे हांजी!

( अंबिका येते. )

अंबि०—अ हा हा हा हा! अकलेवरून दिवेच ओंवाळा!

हाजि०—काय, गृहदेवाची अक्कल बाहेर काढतेस? पण कांहीं नवल नाहीं. ज्याचें अंगीं मोठेपण त्यासी यातना कठीण बाकी आपण कशाला कोणाची निंदा करा!

अंबि—अहो, सारी प्रजा राणी विमलादेवीच्या पक्षाला वळलेली आणि तुह्मी त्या नटकीच्या मागं गोंडा घोळीत आहांत, तेव्हां तुम्हाला म्हणूं तरी काय?

हाजि०—दीर्घ आहेस ! बायकी डाकें जर मुत्सद्दी असतं तर बिचाऱ्या ओठांना मिशीचा भार का सोसावा लागता ? पण मिशी ती मिशी !

अंबि०—गृहलक्ष्मीचा त्याग करून राणाजी त्या अवदसेच्या नादीं लागले आहेत, अशी तिच्यांत त्यांना मोहिनी तरी कोणती दिसली आहे ?

हाजि—ती जर तुला कळती तर बायको का होतीस ? अर्थात ती नाहीं ह्मणून ती झालीस.

अंबि—राणी विमलादेवीकडे पाहून लोक स्वस्थ आहेत बरं ! नाहींपेक्षां राणाजींना कळता ग्रहदशेचा फेरा !

हाजि०—आदिमाते, तोंडाचा पट्टा थोडा आंवरता धरायचा वरप्रसाद होईल का ? आजकाल घराच्या भींतीहि कान टौंकारून टपलेल्या असतात. तूं जाशील करायला थट्टा पण माझ्या धोरणाला लागेल बट्टा आणि फसेल पोरीचा सट्टा !

अंबि०—हें पहा अगदीं निक्षून सांगतें, पुनः जर ललितागौरीचीं माझ्यापुढें स्तोत्रं गाऊं लागला तर मला मुळींच खपणार नाहींत. माझ्या शामकुवरच्या नशिबीं जर चंद्रकिशोरजींचे पाय देवानं योजले असतील तर ब्रह्मदेवालाहि ते चुकवितां येणार नाहींत. म्हणून सांगतें त्या बटकीची माझ्यासमोर बादशायी नको आणि तुमची पण हाजिशायी नको.

हाजि०—मग काय भिक्षांदेही हवी आहे ? आंखूडशिंगी, बेरंगी, अक्कलशून्य !

अंबि०—ललितागौरीच्या चिथावणीनं राणाजींनीं वृद्ध मंत्र्याला बडतर्फ केलं म्हणून प्रजा फार खवळली आहे. जागोजागीं सभा भरवून राणाजींवर टकेचा वर्षाव चालू आहे, मग आपणाहि नको का विरोध प्रकट करायला ?

हाजि०—उगाच नाहीं ब्रह्मदेवानं हातांत कांकणं भरलीं ! अग शहाणे, निंदकाचें घर असावें शेजारीं तरीच बैसावें देव्हारीं. काय समजलीस ?

अंबि०—कांहीं नाहीं समजलं.

हाजि०—नाहींच समजायचीस. असे समज जर सहजासहजीं समजूं लागले तर ते समज कसले ? ते तसे समजत नाहींत म्हणून त्यांना समज म्हणायचे.

अंबि०—माझी शामकुवरदेखील या तुमच्या वृत्तीचा तिरस्कार करूं लागली.

हाजि०—वा, माझी पोरं म्हणजे जणूं पुराणवाक्यच ! अग पोरांना जर घोर कळतां तर तुझ्या तोंडाचा जोर कसा चालता ? पण हीं पहा मंदिरांत वाद्यें वाजूं लागलीं. चल, पूजासाहित्य तयार कर.

अंबि०—पण राणाजी येणार आहेत का ? त्या सटवीच्या पिंजऱ्यांतून सुटतील तेव्हां खरे !

हाजि०—आधीं आपल्या वटवीचा विचार कर. मूर्ख कोठली ! म्हणतात ना " आधीं पोटोबा मग विठोबा ! "

( जातात. )

---

## प्रवेश ३ रा—राजमंदिर.

( विमलादेवी व मृणालिनी. )

४ पद ( यमन कल्याण–एकताला. )

**परमार्थ पदाला । मार्ग अनंत विशाला ॥ धृ ॥**
**गमत एक भव तराया जडजीवा सफल व्हाया ।**
**राष्ट्रधर्म स्वजन सेवा साधन सकलांला ॥ धृ. ॥**

विमला०—मृणालिनी, जो तो आपल्या भावनानुसार प्रेमाचा हार गुंफीत असतो. कोणी मातृप्रेम, कोणी पितृप्रेम तर कोणी बंधुप्रेमच श्रेष्ठ मानतात. कविजन तर दांपत्य प्रेमालाच शिरोभागीं नाचवितात. मृणालिनी या सर्व प्रेमांना जनन देणाऱ्या राष्ट्रीय प्रेमाहून शुद्ध, अखंड व सात्विक असं दुसरं कोणतं प्रेम मोक्षप्रद आहे !

**मृणा०**—राणीसाहेब, ज्या दिव्य प्रेमाची मूर्ति आपण पूजित आहांत, त्या प्रेमाकडे संसारसुखाची तृप्ति झाल्यावांचून कशी बरं मनाची वृत्ति वळणार !

**विम०**—विषयीजन, विषयसुखालाच प्रेम समजून सुखाकरतां धडपडत असतात पण जें मुळीं सत्य नाहीं त्यांत सुख कोठून मिळणार ? मृणालिनी, हें शुद्ध प्रेम ह्मणजेच परमेश्वराचा अवतार, महात्म्यांची कैवल्यगति राष्ट्राची प्रगति.

**मृणा०**—पण ज्यांनीं संसारसुखाचा किंचितही अनुभव घेतला नाहीं त्यांना त्या प्रेमाची कशी ओळख पटणार ?

**विम०**—खरं आहे. ज्यांना आपल्या जन्माची इतिकर्तव्यता आहार विहार करणाऱ्या पशूकोटीहून अधिक भासत नसते त्यांना या दिव्यप्रेमाची कोठून ओळख होणार ? पण या विमलादेवीला पवित्र कर्तव्याची जाणीव आहे, दिव्यप्रेमाची मूर्ति अहोरात्र हिच्या दृष्टीसमोर खेळत आहे तेव्हां विषय-सुखाकरतां हिनं का तळमळावं ?

**मृणा०**—दिव्य प्रेमाच्या आपण मूर्तिमंत देवता आहांत पण राणीसाहेब एखादं तरी नाजुक सकुमार गोंडस अर्भक अंकावर खेळविल्यावांचून कोणत्या स्त्रीला हें दिव्यप्रेम मिळवितां येईल ?

**विम०**—हाच तर मोह ! एखादं दुसरं लुलं शेंबडं पोर, चार फुटकीं भांडी, आणि चंद्रमौळी झोंपडी यांना गुरफटून एखाद्या किड्यासारखं वळ-वळत रहाणं ह्मणजे खरा संसार नव्हे. मृणालिनी, ज्याला खरा संसार थाटायचा असेल त्यानें हा ईश्वरनिर्मित राष्ट्रसंसार प्रेमाच्या व धर्माच्या शुद्ध पायावर उभारण्याच्याच खटपटीस लागलं पाहिजे.

५ पद ( धनाश्री–त्रिवट. )

सेवा-देश काज या देहीं ॥ धृ. ॥
तरिच दिसे जनीं प्रभुवर बाई।
भव भय जाई ॥ सुख तें पाही ॥ १ ॥

**मृणा०**—राणीसाहेब आपणासारख्या राष्ट्रदेवतेची राणाजींना पारख नसावी हें केवढें दुर्दैव !

**विम०**—यांत कसलं दुर्दैव ? हा पुष्पहार पहा. यांतील हीं निरनिराळीं फुलं एका धाग्यांत गुंफल्यामुळं बकुल, मालती, जाई इत्यादि भेद नाहींसे होऊन पुष्पहार हें विश्वबंधुत्व त्यांना प्राप्त झालं. मृणालिनी, या पुष्पहाराप्रमाणंच मलाहि राष्ट्रीय प्रेमाच्या धाग्यांत ऐक्याचा अग्रहार गुंफायचा आहे. मग स्वतःच्याच सुखाची चाड बाळगून कसं चालणार ?

**मृणा०**—तर मग त्या राष्ट्रीय धर्माच्या वृक्षावर थैमान घालणाऱ्या ललितागौरीच्या कारस्थानाचा नको का नायनाट करायला ?

**विम०**—बाई, उतावळेपणानें कार्यसिद्धि होत नसते. शिवाय स्वामींनीं ललितागौरीचा मोह टाकावा अशी इच्छा करण्यापूर्वी मलाहि नको का स्वार्थत्यागाची खात्री करून द्यायला ?

**मृणा०**—ती द्यायला काय बाकी उरली आहे ? आपणासारख्या महान् योगिनीच्या दर्शनानं कोणाचं अंतःकरण पूज्यभावानं प्रेरित झाल्यावांचून राहील ?

**विम०**—नाहीं, मला माझ्याकरतां जनतेची मनं पूज्यभावानं प्रेरित करायची नसून तीं या राष्ट्रकल्याणाच्या धर्मरक्षणाकरतां जागृत राखावयाची आहेत. मृणालिनी, ज्या राष्ट्राचा, ज्या समाजाचा, ज्या व्यक्तीचा धर्म जागृत असतो त्याकडे काळालाहि नजर फेंकतां येत नाहीं.

( चंद्रकिशोर येतो. )



अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

शामकुवर—का बोलायचंना—

( अं. १ प्र. ४ )

चंद्र०—पण त्या काळावर शह बसविणारीं माणसं जर जगांत वांवरूं लागलीं तर त्यांचा नको का उच्छेद करायला ?

विम०—किशोरजी, असे उतावळे कां होतां ? ज्या कार्यांत पंडित शिवशर्माजीसारखे कर्मवीर कायावाचामनें झटत आहेत त्यांत आज नाहीं उद्यां यश ठरलेलंच आहे.

चंद०—मासाहेब, पंडितजी शांतवृत्ति ठेवण्याचा मला उपदेश करतात पण मी तरी काय करूं ? ज्यांचं नांव उच्चारतांच शत्रूंच्या वृत्ति थरारून जाव्यात, ज्यांच्या समशेरीचा झणात्कार कानीं पडतांच कसलेल्या वीरांच्या कट्यारी भूमीचा आश्रय घेण्यास धांव घ्याव्यात, तो या चितोडचा कडवा सिंह ललितागौरीसारख्या एका बटकीनें हातीं नाचवावा काय ?

६ पद—( जयजयवंती मल्हार—एकताला. )

**झणिं लयाला गेला दिनमणि हा शौर्यबली हत झाला**
**हरपत निज तेजा ॥ धृ०॥ कुटिल विषायिं बहु रमला**
**धर्म सखा धीर वीर. अनुसरला खल कृतिला विसरुनि**
**शुभ काजा ॥ १ ॥**

विम०—किशोरजी, आम्हा अबलांचं शील एका धर्माच्या उज्ज्वलतेवर आधारभूत असतं. धर्म हेंच राष्ट्राचं स्वातंत्र्य, जनतेचा आत्मा, पतिव्रतांचं जीवन. त्या धर्माचा प्रवर्तक जो राजा तोच जर धर्ममर्यादा ओलांडूं लागला, तर दुर्दैवाचा आणखी कडेलोट तो कोणता ?

चंद०—म्हणूनच सांगतो कीं, दादासाहेब ललितागौरीच्या प्रेममंदिरांत रंगले असले, तिच्या सुंदर हस्तांचं त्यांच्या गळ्याभोंवती वेष्टण पडलं असलं तरी त्यांच्या महालांत चला व आपल्या हक्काची अम्मलबजावणी करा.

विम०—जिचा एक शब्दहि कानीं पडूं नये म्हणून ज्यांनीं मला अशी दूर ठेवली आहे ते तिची भेट कोठून घेणार ! माझ्या आशेचा सर्व भार

मी जनतेच्या सच्छीलावर टाकला आहे. किशोरजी, ज्या राष्ट्राची प्रजा सदाचारी व सत्यप्रिय असते त्या राष्ट्राची इभ्रत जागृत आहे, हा आत्म-विश्वास मुळींच डळमळूं देतां कामा नये.

चंद०—वहिनीसाहेब, परमेश्वरानें जर मला आपल्या पोटीं जन्माला घातलं असतं तर आपल्या दिव्यगुणांचा थोडाबहुत तरी अंश मला प्राप्त झाला असता. देहपतनानंतर जर पुनर्जन्म असेल तर तो जन्मोजन्मीं आपल्याच पवित्र उदरांत येवो !

७ पद ( हमीर—त्रिवट. )

**द्याया जागिं जनना । समर अमर रण विजय वरा वीर ॥ धृ. ॥ परम पुनित जननिशा कुलावरदा । अवतरती दयाल ॥ ॥**

विम०—केवळ माझ्या उदरीं जन्म घेतल्यानें दिव्यता येणार नाहीं. माझ्या उदराची जर चाड असेल, तर पंडितजींनीं आंखलेल्या धर्ममार्गानें जा आणि धर्मरक्षणाकडे आपल्या तारुण्याचा जोम खर्ची घाला.

चंद०—माझ्या कर्तृत्वाचीच कसोटी पहायची असेल तर आज्ञा द्या, हा अस्सा जातों व या नखांनीं ललितागौरीचं नरडं फोडून भावी अनर्थांची परंपरा दूर करतो.

विम०—कराल, आपण शूराचे बच्चे आहांत! सत्वरक्षणार्थ आकाशा-लाहि हात घालाल पण मला यादवी माजवायची नाहीं. प्रेमानेंच प्रेम वाढ-वायचं आहे.

चंद०—पण प्रेमाच्या कोमल वर्षावानं असुरीवृत्तीला कसा आळा बसणार ?

( हाजिसिंग येतो. )

हाजि०—हांजी, मोठा कठिण प्रसंग आला आहे !

विम०—कसला प्रसंग ?

हाजि०—कांहीं विशेष नाहीं—बाकी प्रसंग आहे—पण जाऊं द्या आपण कशाला कोणाची निंदा करा !

विम०—म्हणजे, काय तें स्पष्ट बोला.

हाजि०—हांजी, स्पष्टपणाची आतां कुठं कदर उरली आहे ? कडू कारलं तुपांत तळलं, साखरेंत घोळलं तरी तें कडूच ! पण आपण कशाला कोणाची निंदा करा !

विम०—कसली निंदा ?

हाजि०—छे छे छे छे छे राणीसाहेब, इतकं कांहीं भ्यायला नको. बाकी वेळ मोठी आणीबाणीची आली आहे खरी. पण कांहीं नवल नाहीं किती झाली तरी बटीक. पण जाऊं द्या आपण कशाला कोणाची निंदा करा !

चंद०—मामासाहेब काय तें स्पष्ट सांगा. असल्या संदिग्ध भाषणानं मासाहेबांच्या मनाला कष्ट होत आहेत.

हाजि०—हांजी ! मनाला कष्ट करण्यांत कोणता मतलब ? वारा येईल तशी पाठ दिली पाहिजे. चामुंडरायाची मंत्र्याच्या जागीं स्थापना झाल्यामुळें आधींच खवळलेल्या जनतेंत नवीन भर पडली, पण जाऊं द्या आपण कशाला कोणाची निंदा करा !

विम०—ललितागौरीनं आणखी नवीन कारस्थान रचलं नाहीं ना ?

हाजि०—राणीसाहेब, राजकीय कुलाचारोत्सवांत अजिताला प्रतिबंध केल्यामुळें ललितागौरी वाघिणीसारखी चवताळली असून, बाकी तिची ती चूकच आहे पण आपण कशाला कोणाची निंदा करा !

विम०—हाजिसिंग !

हाजि०—हांजी. भयंकर अधर्म !

चंद०—कसला अधर्म ?

हाजि०युवराजपदाचा अभिषेक करून कुलाचारासिवाकरतां मांडलेल्या-राजासनावर अजिताला बसविण्याकरितां ललितागौरीनें राणाजींना प्रवृत्त केलं आहे.

विम०—काय सांगतां ! माझे स्वामी ललितागौरीच्या मोहांत कितीजरी गुरफटले असले तरी त्यांच्या हातून ही अकल्पित घटना कशी घडणार ?

हाजि०—राणीसाहेब, वर्तमानकाळांतून पार पडल्यावर भविष्यकाळाचा विचार. आज तेवढ्याकरतांच तर मंदिरांत खास बैठक भरणार आहे. निर्मळ अत्याचार ! पण जाऊं द्या. आपण कशाला कोणाची निंदा करा !

विम०—काय मी हें ऐकतें ! ज्या धर्माच्या शुद्ध पायावर स्वातंत्र्य इमारतीची उभारणी झालेली असते, त्या धर्माच्या उज्ज्वल प्रकाशावर अनाचाराची सांवली पडूं लागली कीं, मोठमोठीं साम्राज्येंहि उलथींपालथीं पडून त्यांचे तुकडे तुकडे झाल्यावांचून रहात नाहींत. किशोरजी, आतांच्या आतां पंडित शिवशर्माजींच्या भेटीची योजना करा.

८ पद. ( अडाणा—त्रिवट. )

अधर्म हराया विषमा नृप गातिला । नाहिं जगतिला
गुरुपदाविणें मजला आसरा या समयाला ॥ धृ. ॥
गमे लांछना विमल धवल शीला । जाय जरी धर्म
हा विलयाला ॥ १ ॥

( जाते. )

अनुक्रम
नों. दि.

## प्रवेश ४ था—बगिच्या रस्ता.

( शामकुंवर तन्मय स्थितीत येते. )

शाम०—का, बोलायचं ना—असं काय तें—किती अबोला धरायचा !

९ पद ( केदार—एकताला.)

राग काय हा कठोर मधुर बोल बोला ॥ ध्रु० ॥ विकल
होत प्राण भ्रांत । विरह मज न सहन होय । मुदित
वदन करि प्रशांत । बोला नाथा कृपाळ ॥ १ ॥

चुकलें ह्मणतें—एकदां, दहादां, शंभरदां आतां तरी झालं—पुनः किनई कध्धीं कध्धीं ह्मणून दूर जायची नाहीं—अश्शी चिकटून बसेन—पण हें काय—जा गडे इतकं समजावून सांगते, मनधरणी करते, क्षमा मागते तरी आपलं तेंच न तेंच—ही शामकुंवर किनई कध्धीं खोटं बोलत नसते. आपण थकून भागून आलां ह्मणजे जाईच्या मंडपाखालीं आपले पाय चुरीत बसेन ह्मणून ना मंडपावर जाईची वेल सोडली? जाईच्या फुलांवर आपली फार भक्ति—मग पाणी घातल्यावांचून का फुलं येतात? भारीच बाई कोंवळं मन ! पाण्याकरतां जरा कुठं दूर झालें तों हें अस्सं ! पण गडे युद्धावर जाणं झालं, मग ही शामकुंवर कशी दृष्टीला पडणार—युद्धाचं नांव निघताच कसं पण मुखकमल फुललं—पुरे बरं आतां हे लपंडाव. उसना आव आणून का खरं हास्य लपतं? अहा ! काय पण मुखावर वीरश्री झळकू लागली ! दृष्टच लागायची ? मीठमोहऱ्या तरी ओंवाळते—हें पहा तुह्मी किनई असेच वीरश्रीनें फुला ह्मणजे आपला विरह सोसण्याचं धैर्य माझ्या अंगीं येईल—माझी मुळींच काळजी करूं नका. मी आपली धर्मपत्नि होणार ना? मग आपलं तेज मला कसं बरं येणार नाहीं ! आपण युद्धावर गेला कीं माझं प्रेम प्रत्येक क्षणाला आपल्या सेवेला येईल—पण त्या बरोबर विजयाचे संदेश पाठवायचेहो—प्रेमाचे संदेश मला मुळींच खपणार नाहींत—आपण विजयश्रीनें भूषित होऊन यावें माझ्या भेटीला

याल म्हणून आपल्या आवडत्या जाईचा हार गुंफून आपल्या वाटेकडे दृष्टि लाऊन बसेन आणि आलात कीं अस्सा—( हार घालण्याचा आविर्भाव आणते तोंच नंदिनी येते शामकुंवर लाजते. )

**नंदि**०—अग अशी लाजलीस काय ? विजयश्रीनें नटलेल्या प्रियकराला प्रेमाची माळ घालायला वीरपत्नि लाजत नसते.

**शाम**०—जा गडे, मला नाहीं असली चेष्टा खपायची.

**नंदि**०—किती पण मी दुष्ट ! बिचारी खरा अनुभव कधीं येईल तो येवो पण मनोराज्याचं सुखहि माझ्याच्यानं पहावलं नाहीं.

**शाम**०—नंदिनी, मनोराज्य का म्हणतेस, माझे किशोर माझा मनोभंग का करतील ?

**नंदि**—अग, पण किशोरजीकरतां जशी तूं रात्रंदिवस तळमळत आहेस तसं त्यांच्या मनाला कांहीं वाटतं का ?

**शाम**०—नंदिनी, तरुण मुलींना प्रेमाचं गति आळविण्यापलिकडे कसला आला आहे विचार ? पण माझ्या किशोरजींनीं हातीं बांधलं आहे ना राष्ट्रकार्याचें कंकण ? राणाजीसारखे ते स्त्रीलंपट नाहींत !

**नंदि**—नसतील ! पण तुमचं लग्न तरी कधीं होणार ? आतां तूं लहान का आहेस ?

**शाम**०—अग वेडे, तें माझ्या हातीं का आहे ? ललितागौरी कधीं प्रसन्न होणार तेव्हां राणाजी मान तुकविणार आणि नंतर दळ हालणार !

**नंदि**०—पण तुझ्या बाबांचं आहे ना तिच्याजवळ वजन ? मग त्यांना नाहीं का तुझी काळजी ?

**शाम**०—नंदिनी, लग्न कधीं घडायचं असेल तें घडो पण आमच्या प्रेमावर तर नाहिं ना कोणाची सत्ता ? माझ्या किशोरजींचं माझ्यावर शुद्ध प्रेम आहे असं जोपर्यंत माझं मन मला साक्ष देत आहे, तोपर्यंत सारा जन्म जरी कुंवरपणांत घालवावा लागला तरी तो मी मोठ्या आनंदानें घालवीन.

**नंदि०**—पण प्रफुल्लित कमलिनीवर भुंग्यांच्या झुंडी तुटून पडतील त्यांची काय वाट ?

**शाम०**—मग माझ्या किशोरजींची प्रेमशक्ति आहे ना तिचं रक्षण करायला.

**नंदि०**—असेल बाई ! पण हें बघ राणाजी सर्वतोपरी ललितागौरीच्या हातांत आणि किशोरजींना तर ललितागौरीचा आदर नाहीं, तेव्हां तिच्या पोटांत शिरून तूं आपला कार्यभाग साधून घे.

**शाम०**—नंदिनी, स्वार्थाकरतां पतीच्या करारीपणाला लांछन आणणारी प्रेमाला कधींतरी पात्र होईल का ? माझे बाबा कसेहि वागोत, पण किशोर-जींची ही छाया चंद्राला टाकून राहूकडे कधींच वळणार नाहीं.

१० पद ( झिंझोटी—केरवा. )

**भाव जिवाचा एकरसा वा प्रेम अचल रुप त्यालें ॥धृ.॥ नच मोह गमे प्रेमाला स्वार्थ सुखाला । नच त्याग रुचे कल्पांतीं प्रेमगुणाला ॥ १ ॥ हा जीव फुलें प्रेमबलें हसावि मुखाला । हा प्रेमरूपिं परमात्मा डुलावि जगाला ॥ २ ॥**

( जातात. )

---

## प्रवेश ५ वा— एकलिंगजीचें मांदिर.

( अजिताला राजासनावर बसविण्याकरतां वीरेंद्रसिंह व सरदार वगैरे मंडळी. )

**वीरें०**—शास्त्रीमंडळादि सरदारहो, एका विशिष्ट कार्याकरतां आज जी मी ही खास बैठक भरविली आहे, तिचा उद्देश तुम्हाला कळलाच आहे तेव्हां आपआपलं मत मोकळ्या मनानं जाहीर करा.

हाजि०—हांजी.

१ सरदार—महाराणाजी, या अजिंक्य तक्तावर अधिष्ठित होणाऱ्या प्रत्येक राजपुरुषानें आपलं नांव अजरामर करून ठेवलं आहे. त्याच पुण्यश्लोक, धर्मशील, उदारधी थोर शिशोंदिया वंशांत उदय पावलेल्या महाराणा वीरेंद्रसिंहाच्या हातून योजलेलं प्रत्येक कृत्य त्रिकालाबाधित सत्त्याइतकंच सत्त्य असणार.

हाजि—हांजी.

२ सरदार—दयावंत, महासागरासारखा अफाट सागर त्यालाहि पक्षपातानं चढउतार असतो पण सागराहूनहि विशाल अशा आपल्या हृदयाला कधींहि उतार आलेला नाहीं. पवित्र राजधर्माठिकाणीं आपली निश्चल भक्ति असल्यामुळें आपणासारखे धर्मयुधिष्टिर आपणच!

हाजि—हांजी, महाराणाजींची कारकीर्द ह्मणजे कारकीर्दच!

शास्त्री—कृपाशील दयावंत, आमच्या तीन पिढ्यापासून आपल्या कुलाचार पूजनाचा अधिकार माझ्या घराण्याकडे चालत आलेला आहे त्यावरून दातृत्वांत कर्णाला खालच्या पायरीवर ओढणारे, कर्तृत्वांत भगीरथालाहि खालीं पहावयास लावणारे सत्त्याचे आदर्श काय ते आपणच!

हाजि—हांजी, आदर्श पण शुद्ध बिलोरी!

वीरें०—महाजनहो, धर्मगुरू पंडित शिवशर्मासारख्या महा विद्वान पण डोके फिरू वृद्धानं ललितागौरीविरुद्ध खोट्यानाट्या कंड्या पिकवून जनतेंत अस्वस्थता उत्पन्न केली आहे. तिच्या सदिच्छेचा विपर्यास चालविला आहे.

हाजि—हांजी, हें अनुभवसिद्ध सत्त्य आहे.

वीरें०—ललितागौरीबरोबर आह्मी लौकिक विवाह लावला नाहीं तरी दिव्यगुणामुळें ती जनतेच्या आदराला पात्र आहे. प्रजाहिताकडे तिनें आपलं तनमन वाहिलं आहे. आम्हाकडून राजधर्माचीं बंधनं तुटूं नयेत, एवढ्याचकरतां डोळ्यांत तेल घालून रात्रंदिवस ती दक्ष आहे. प्रजेला ती पुत्रवत

पहात आहे तेव्हां तिच्या ठिकाणीं तुमचा अपूज्यभाव असणार नाहीं, अशी मला खात्री आहे.

हाजि—हांजी ! हिरा तो हिरा आणि गार ती गार !

वीर०—तर मग तिच्या उदरीं जन्म पावलेला हा माझा कुमार अजितसिंह युवराजपदाला मान्य आहे अशी एकमतानें सम्मति द्या.

हाजि—हांजी, सम्मतीचं काय प्रयोजन ? प्रभू आज्ञा शिलालेख ! राजा स्वदेशे पूज्यते !

शास्त्री—कायद्यांचीं कलमं जशीं वेळोवेळीं खेळवावी लागतात, तशी शास्त्रवचनांचीहि छाटाछाटी झालीच पाहिजे.

हाजि—हांजी ! राजा बोले दळ हाले, काजी बोले दाढी हाले !

शास्त्री—अहो, फलाची उत्पत्ति बीजावर. वृक्ष केवळ साधन मात्र तेव्हां कुमार अजितसिंह शास्त्रानं, कायद्यानं व हक्कानं युवराजपदाला वारस आहे असं आम्ही एकमतानं प्रस्थापित करतो.

हाजि—हांजी ! हांजी बोला ( सर्व ) युवराज अजितसिंहकी जय !

वीरें०—महाजनहो, कुमार अजितसिंहाला आपला युवराज म्हणून जसा मान्य केलात तसा कुलाचाराकरतां मांडलेल्या या राजासनावर एकमतानें बसवा.

शास्त्री—राजबीजाला कुलधर्माचा पूर्ण हक्क आहे.

वीरें०—बेटा अजित, सर्वांना वंदन कर व आसनावर आरूढ हो.

सर्व—हांजी, बोला अजितसिंहकी जय !

( त्याला आसनावर बसविण्यास जातात तोंच शिवशर्मा येतो. )

शिव०—थांबा, असा अत्याचार करूं नका ?

वीरें०—कोण पंडितजी ? अगदीं वेळेवर आलात. या बहुश्रुत मंडळाच्या सम्मतीनें कुमार अजितसिंहाला युवराजपद अर्पण करून गादीला वारस केला

आहे तेव्हां त्याला कुलाचाराकरतां मांडलेल्या या राजासनावर बसविण्याचा बहुमान मी तुम्हाला देतों.

**शिव०**—काय, पवित्र राजधर्माची खिचडी आणि शास्त्राधारावर ? बोला महापंडितहो, कोणत्या धर्म शास्त्रानें असला औरस हक्क सम्मत केला आहे ? कोणता समाज असल्या एकीकरणाला राजी आहे ?

**शास्त्री०**—पंडितजी, आम्ही इकडे शास्त्रावर वादविवाद झोडण्याकरतां जमलों नसून महाराणाजींच्या सेवेकरतां हजर झालों आहोंत.

**हा.जि०**—हांजी ! मनः पूतं समाचरेत !

**वीरें०**—पंडितजी, शास्त्राची मिमांसा करीत वेळेचा अपव्यय करण्याची आमची इच्छा नाहीं. तुम्हालाहि यांच्या मताला मत दिलंच पाहिजे.

**शिव०**—नाहीं, कोणताहि निस्पृहि पुरुष अधिकार भितीनें मतस्वातंत्र्याला ढळत नसतो.

**वीरें०**—काय, राणा वीरेंद्रासिंहाच्या अधिकाराचा उपमर्द ?

**शिव०**—नाहीं ! वीरेंद्रासिंहा, तुझ्या सत्तेचा, तुझ्या अधिकाराचा, या गादीचा उपमर्द या शिवशर्म्याच्या हातून कधीं झाला नाहीं व होणार नाहीं आणि म्हणूनच या स्वार्थसाधू लाळघोट्यांच्या लाघवी भाषणाला भुरळून लोकक्षोभाला कारण होऊं नकोस.

**वीरें०**—कसला लोकक्षोभ ! रात्रंदिवस राजद्रोहात्मक आरडाओरड करीत तुह्मी माझ्या प्रजेंत अराजकता पसरीत आहांत, मानमान्यतेच्या ढोंगी निःस्वार्थाखालीं आपल्या लौकिकाचं प्रदर्शन उघडीत आहांत, तरी आपण वयोवृद्ध, बहुश्रुत धर्मगुरू म्हणून आजपर्यंत स्वस्थ बसलों पण आज प्रत्यक्ष माझ्या वाणीचा अपमान, तो मला प्राणांतीहि खपणार नाहीं.

**शिव०**—तो खपूं नये एवढ्याच करतां माझी सारी ओरड आहे. वीरेंद्रसिंहा, मला मानमान्यतेची चाड नाहीं. किंवा वैभवाची लालसा नाहीं.

ज्या धर्ममंडित गादीच्या इभ्रतीचा केसरी झेंडा ललितागौरीच्या स्पर्शानें डळमळूं पहात आहे तो लोकमताला चिथावून खालीं ओढूं नकोस.

वीरें०—माझ्या सत्तेची प्रखर तलवार लोकांच्या मानेवर तळपत असतां लोकमताला कोण जुमानतो !

शिव०—नाहीं ! लोकमताला झुगारणाऱ्या सत्तेची घमेंड फोल आहे. राष्ट्राच्या उन्नतावस्थेला धर्माधर्म विचार जितके आधारभूत असतात तितकी राजसत्ता लोकमताच्या पायावरच टिकत असते.

वीरें०—असेल ! दुबळ्या सत्तेनं लोकमताला थरारून माथं खालीं वांकवावं पण ज्यांनीं आपल्या सत्तेची जरब प्रजेच्या रोमरंध्रीं खिळविली असते, त्यांच्या वाणीचा अधिकार हाच अनियंत्रित सत्तेचा पाया असतो.

शिव०—असल्या फोल घमेंडीवर दुःशासनी सत्ता चालविणाऱ्या राजांचीं सिंहासनं बेचिराख झालीं आहेत, अशी इतिहास साक्ष पटवीत आहे.

वीरें०—कसला इतिहास आणि साक्ष !

शिव०—वीरेंद्रसिंहा, प्रजेचा आदर हेंच राजाचं ध्येय. धर्मपालन हीच सत्तेची प्रचंड शक्ति आणि समता हेंच राजाचं शील. या त्रयीच्या भक्कम पायावर उभारलेली सत्ता काळालाहि छिनाहून घेतां येत नसते.

वीरें०—बस्स ! धर्मगुरूच्या नात्यानें अजिताला राजासनावर आरूढ करून आशिर्वाद द्या नाहिंपेक्षां येथून चालते व्हा.

शिव०—तुझ्या क्रोधाग्नींत दग्ध होण्याची जरी पाळी आली तरी तुझ्या हातून अधर्म घडूं देणार नाहीं. सत्याच्या पायावर उभारलेला निग्रह कर्तव्य पालनाकरतां जितका खंबीर असतो तितकाच तो संकटांना बेदरकार असतो.

वीरें०—पंडितजी, परिस्थितीकडे नजर द्या, नाहींपेक्षां परिणाम अनिष्ट होईल.

शिव०—ज्या दिवशीं धर्मगुरूची दीक्षा ग्रहण करून लोककार्य हातीं घेतलं त्याच वेळीं देहिक बंधनं तोडलीं आहेत, आतां काय वाटेल तें होवो

अजिताला युवराज ह्मणून आशीर्वाद देणार नाहीं व देहांत रक्ताचा एक थेंब असे पावेतों त्याला—राजसनाला स्पर्श करूं देणार नाहीं.

( ललितागौरी येते. )

ललिता०—कुणाला स्पर्श करूं देणार नाहीं ?

शिव०—या तुझ्या अजिताला.

ललिता—काय, ललितागौरीला, चितोडच्या या परीला, राणा वीरेंद्र-सिंहाच्या शक्तीला हें उत्तर ?

शिव०—ललितागौरी, माझं उत्तर व्यक्ति द्वेषाकरतां नसून भावी संक-टाच्या परिहारार्थ आहे गादीच्या लौकिकाकरितां आहे.

ललिता०—असला फुसका लौकिक ही ललितागौरी मुळींच जुमानीत नसते. राणाजी, असे पहातां काय ? माझ्या अजिताला राजासनावर अधिष्टित करा.

शिव०माझ्या देहाचे तुकडे तुकडे करीपर्यंत मी अत्याचार कधींहि घडूं देणार नाहीं. वीरेंद्रासिंहा, विचार कर, तुझ्या पुढें उभी असलेली ही ललिता तुझ्या नाशाची सैतानी माया आहे. तिच्या मोहानें विपत्तीला कारण होऊं नकोस.

ललिता०—राणाजी, या थेरड्यानं तुमच्यादेखत माझा अपमान चाल-विला असतां तुमच्या नसांतील रक्त अझून थंड ?

वीरें०—पंडितजी, माझ्या ललितागौरीचा अधिकार जाणत आहांत ना ?

शिव०—असल्या उन्मत्त वार्णीचा अधिकार कोणताहि अस्सल रक्ताचा पुरुष जुमानीत नसतो.

ललिता०—तर मग ती तो येथल्या येथें जुमानायला लावणार.

सरदार०—पंडितजी, हट्ट सोडा, माफी मागा. का उगाच राजशास-नाला पात्र होता ?

शिव०—राजशासनाची भीति तुम्हा नीच श्वानांना ! परमेश्वराची विराट शक्ति जोपर्यंत सत्यमार्गावर पसरलेली आहे, तोंपर्यंत कोणी कितीतरी क्रूर

मार्गाचं अवलंबन केलं तरी अंतीं सत्याचाच जय होणार हा मला पूर्ण आत्मविश्वास आहे.

ललिता०—हा तुझा आत्मविश्वास तुझ्या अंधश्रद्धेचा फुसका लाळा आहे.

शिव०—माझा आत्मविश्वास जर माझ्या अंधश्रद्धेचा फुसका ताठा असता तर ललितागौरी तुझं खूनसी अंतःकरण नुसत्या माझ्या नांवाला इतकं थरारलं नसतं.

ललिता०—माझं खूनसी अंतःकरण जर कमजोर असतं तर माझ्या कर्तबगारीचा पाश चोहीकडे पसरलाच नसता.

शिव०—तुझ्या कर्तबगारीचा पाश किती कमकुवत आहे तो जर तुला कळता तर आपल्या अघोर वासनेला अशी बळी पडली नसतीस. ललितागौरी, अनीतीच्या भुंग्यांनीं पोखरलेलं मन दरारा बसविण्याइतकं खंबिर नसतं. त्याचा फुसका दरारा उलट त्याचा नाशालाच कारण होत असतो ?

ललिता०—शिवशर्म्या, धर्मगुरूच्या सुखचैनींत लोळायचें टाकून राजकारणाच्या आगींत उडी टाकीत आहेस पण तुझीं हीं जीर्ण हाडं खाक करायला एका पळाचाहि अवकाश लागणार नाहीं.

शिव०—डबक्यांत लोळणाऱ्या बेडकीला धर्मगुरूची कर्तव्यदिशा काय कळणार ! ज्या धर्मपीठावर जनतेनें मला आरूढ केलं आहे तें धर्मपीठ, जर तुझ्या क्षुद्र समजुतीप्रमाणें सुखचैनीचं असतं तर माझ्या एका शब्दाला राजसत्ता अशी कचरली नसती. ललितागौरी, धर्मपीठाच्या प्रखर तेजावर राजसत्ता आधारभूत असते म्हणूनच धर्मपीठाचा अधिकारी पुरुष खंबीर छातीचा स्पष्ट वाणीचा व सच्चा दिलाचा असावा लागतो.

ललिता०—तर मग दाखीव आपल्या सच्चा दिलाची करामत ! कोण आहे तिकडे ? करा याला अटक.          ( शिवशर्म्याला अटक करतात. )

शिव०—अटक करा कीं काय वाटेल तें करा, पण वीरेंद्रसिंहा, पूर्ण लक्षांत ठेव, राजनिष्ठेला कालिमा लागू नये म्हणूनच तुझ्या एकनिष्ठ प्रजेनं या ललितागौरीच्या नादानं तूं चालविलेले अत्याचार सहन केले पण यापुढें तुझी प्रजा स्वस्थ बसणार नाहीं. म्हणून सांगतों कीं अजून सावध हो, नाहींपेक्षां हा तुझा अविचार तुझा आणि तुझ्या सत्तेचा चुराडा केल्यावांचून रहाणार नाहीं.

( पडदा पडतो. )

अंक पहिला समाप्त.



# अंक दुसरा.

अनुक्रम ........
विभाग ........
क्र. ........
नों. दि. ........

## प्रवेश १ ला.

( राणी विमलादेवीच्या वाड्यासमोरील जागी खवळलेले नागरीक येतात. )

१ ला—करा, मुक्तकंठानं सत्याची मागणी करा ! तो आर्य संस्कृतीचा पुरस्कर्ता धर्मरक्षणार्थ कारागृहांत पडला असतां त्याच्या मुक्तते-करतां न्यायदेवता जर जागृत केली नाहीं तर आमच्या ब्रीदाला लांछन असो.

२ रा—नाहीं ! केवळ शाब्दिक कोलाहल माजवून पंडितजींच्या ठिकाणीं दृढ असलेली आमची गुरुनिष्ठा केव्हांहि कसोटीस लागणार नाहीं. आह्मी सत्याकरतां थैमान घालणार ! ललितागौरीच्या कुटिल कारस्थानाचा उच्छेद करणार !

१ ला—थांबा, असे बेहोश होऊं नका ! धर्माचे आपण जितके कट्टे भक्त आहोंत तितकेंच गादीचें एकनिष्ठ सेवक आहोंत. शांतवृत्तीनेंच आपल्याला दैवि संपत्ती वाढवावयाची आहे. तेव्हां धर्मगुरू पंडित शिव-शर्माजींनीं आंखून दिलेल्या आत्मबलाच्या सीमेबाहेर जाऊन पंडितजींच्या शिकवणीचा काय उपयोग होणार ?

३ रा—पण ज्या आत्मबलाचं चैतन्य धर्माच्या उज्वलतेवर प्रमाणभूत असतं त्या चैतन्यावर खरखीत निखारे पडत असतां समाधिवृत्तींत बेगुमान रहाणं म्हणजे पर्यायानं असुरी सत्तेला प्रोत्साहन देण्यासारखंच नव्हे का?

१ ला—भाई, उच्छृंखलपणानं आरंभिलेलं कार्य ध्येयाच्या अधःपाताला कारण होत असतं. कोणत्याहि धार्मिक, राजकीय किंवा सामाजिक संक-टाच्या वेळीं एका दिलानं, नेटानं व चित्तानं मनोवृत्ति कार्याकडे लावल्या, ह्मणजेच कार्यसिद्धि होत असते.

४ था—ही तुमची शांतवृत्तीची शिकवण आमच्या बुद्धिला सम्मत नाहीं. राजा कर्तव्यहीन झाला, प्रजाहिताला विन्मुख होऊं लागला, धर्माच्या अढळ सिंहासनावरून चल झाला ह्मणजे राजनिष्ठा कशी टिकणार ?

२ रा—या खेळीच्या पोराच्या भ्रष्टकारानं कोसळणारी आपदा पंडितजींनीं आपल्या कुरार्‍ही बाण्यानं थांबविली म्हणून त्यांच्या कपाळीं बंदिवास यावा काय ? पंडितजींच्या अटकेचीं कारणं जरी निरनिराळ्या प्रकारांनीं जाहीर होत आहेत तरी त्यांवर आमचा मुळींच विश्वास नाहीं.

१ ला—मग असे उतावळे कां होतां ? अंतीं सत्यमेव जयते हें तत्त्व ध्यानांत ठेवा.

३ रा—अन्यायानं आपला सत्वशील पिता कारागृहांत खिजपत पडला असतां कोणत्या पितृभक्ताचं अंतःकरण प्रतिकाराच्या स्फूर्तीनं उचंबळल्यावांचून राहील ?

१ ला—त्या पितृभक्तीकरतांच शांतवृत्तीनें चितोडची राजदेवता जागी करा, धर्माच्या जयघोषानं दिग्मंडळ भरून काढा. महाराणी—

( विमलादेवी दृष्टीस पडते. )

३ रा—देवी, चितोडच्या धर्मशीलाचं तेज मंद होत आहे. धर्मात्मा अन्यायानें बंदिवासांत पडल्यामुळं देवीच्या निर्मल किर्तीला कलंक लागत आहे.

१ ला—महाराणी, न्याय द्या ! न्याय द्या ! धर्माची पायमल्ली टाळा ! पंडितजींची मुक्तता करा.

विम०—प्रजाजनहो, दुर्दैवानें माझे स्वामी मोहवश होऊन ललितागौरीच्या अनुरोधानें वागत आहेत पण मी माझ्या पवित्र कर्तव्याला विसरलें नाहीं. तुह्मां प्रजाजनांचा आर्तस्वर रात्रंदिवस माझं हृदय फाडीत आहे. राष्ट्रपुत्रांनों, शांत व्हा, धीर धरा, आततायीपणा करून आपल्या मातेला संकटांत लोटूं नका.



शामकुवर--देशासि वाहीला--     ( अं. २ प्र. ३ )

३ रा—महादेवी, पवित्र संस्कृतीनें पोसलेला असा कोणता सत्पुत्र आपल्या मातेला संकटांत लोटील ? पण ज्या पित्यानें धर्माश्रमाची स्थापना करून पुत्राला धर्मदीक्षा द्यावी, तोच पिता जर धर्मभ्रष्ट होऊं लागला तर कोणता पुत्र त्याच्या असुरी वृत्तीचा उच्छेद केल्या-बांचून राहील ?

**विम०**—पण स्त्रीरूपानें अवतरणारी पित्याची आत्मशक्ति पुत्रावर आपल्या सतीधर्माचें छत्र धरीत असतां कोणती असुरी वृत्ति त्या धर्मा-श्रमाला भ्रष्ट करील ? ललितागौरी आपल्या असुरी वृत्तीच्या वातावरणांत जरी उंच उंच भराऱ्या मारीत असली तरी अधर्माचा बिमोड करण्या-करतां महात्म्यांची कैवल्यशक्ति चोहिंकडे पसरली आहे, हें पूर्ण लक्ष्यांत ठेवा.

१ ला—मासाहेब, ज्या बोलघेवड्या हांजीखोरांनीं भ्रष्टाचाराला अनुमति दिली तेच पाठ फिरतांच टीका करूं लागले आहेत.

**विम०**—धर्मपुत्रांनों, निश्चिंत रहा. स्वामींनीं जरी मला आपल्या चर-णापासून दूर लोटली आहे तरी तुह्मां सांप्रदायांकरतां त्यांची मनधरणी करून, माझ्या पंचप्राणांची ओंवाळणी करून, प्रसंगीं आत्मसमर्पण करून विस्खलित होत असलेली धर्माश्रमाची घडी सुव्यवस्थित करिन. गादीच्या लौकिकाकरितां स्वातंत्र्यदेवीला माझ्या पंचप्राणांचा अग्रहार चढवीन.

११ पद ( शिंदुरा कॉफी—त्रिवट. )

**प्राण हा सारा वाही देशोद्धारा स्वजन हिता तरि । विफल न मम वचना माना आर्या ॥ धृ० ॥ त्यजा भया वरा शांति मनाला । गुरु व्यसन पाश ते मुक्त करिन ह्मणें । विफल न० ॥ १ ॥**

---

## प्रवेश दुसरा.

स्थळ—महालांतील एक मार्ग.

( वीरेंद्रसिंह व हाजिसिंग. )

**हाजि०**—राणाजी, जनप्रवृत्ति ही नदीच्या ओघासारखी जिकडे वळण मिळेल त्या दिशेला वळायची. बाकी सत्तेपुढें शहाणपण नाहीं !

**वीरें०**—पण जनप्रवृत्तीवर आधारभूत असणाऱ्या सत्तेनं तिच्या स्वैर-पणाला नको का आळा घालायला ?

**हाजि०**—हांजी, वांकड्या बोटाशिवाय तूप निघत नसतं !

**वीरें०**—पंडितजीला मी अटक केली ती योग्यच नव्हे का ?

**हाजि०**—हांजी !

**वीरें०**—अधिकाराचा उपमर्द करणाऱ्या ताठेखोर वाणीला न्यायाच्या आवारांत कोंडून ठेवणं म्हणजे न्यायाचा अतिक्रम करणं या लोकभ्रमाला काय म्हणावं ? राजसत्तेचा शकट जर मतस्वातंत्र्याच्या कीटकांना पोंखरूं दिला तर भौतिक ऐश्वर्याची क्षणभंगुरता आणि काळाची विध्वंसक सत्ता या दोहींचं प्रदर्शन उघडण्यासारखंच नव्हे का ?

**हाजि०**—हांजी, सत्ताधाऱ्यांनीं लोकमताला पायांखालींच चिरडलं पाहिजे. बाकी आपण कशाला कोणाची निंदा करा !

**वीरें०**—पंडितजींच्या असामान्य विद्वत्तेबद्दल आम्हाला आदर आहे. धर्मगुरू ठिकाणीं आह्मांला ते पूज्य आहेत. त्यांचा करारी व निस्पृह बाणाहि आह्मांला पसंत आहे, पण आम्हा विरुद्ध काहूर माजविण्याचा जो त्यांनीं प्रयत्न केला तेवढ्याकरतांच आह्माला कठोर व्हावं लागलं. ते जर आपल्याला कट्टे देशाभिमानी म्हणवितात तर आमच्या मताळा का मिळत नाहींत ? आह्मी त्यांचा अवश्य परामर्ष घेऊं.

**हाजि०**—हांजी ! राजा ह्मणजे परमेश्वराचा प्रतिनिधी, सत्तेचा धनी, ऐश्वर्याचा अधिकारी ! त्याच्या इच्छेचा विरोध ह्मणजे पर्यायानें राजद्रोहाचाच

गुन्हा होय. राणाजींनीं यथान्याय अटक केली. बाकी आपण कशाला कोणाची निंदा करा!

वीरें०—आह्मी विमलादेवीबरोबर विवाह लावून तिचा त्याग केला यांत काय बिघडलं? ती जित राष्ट्राची कन्या ह्मणजे गुलाम! सांखळीचे दुवे जसे एकांत एक अडकवावे लागतात तसे जितराष्ट्राचे दुवे सत्तेच्या सांखळींत परोपरीनें जखडले पाहिजेत. नाहींपेक्षां सत्तेची शाश्वति जयद्रथाच्या सूर्यास्तासारखीच भ्रामक ठरते.

हाजि०—हांजी, दिवस बुडाला मजुर उडाला!

वीरें०—ललितागौरीच्या स्वर्गीय लावण्यावर आमची दृष्टि खिळून आह्मी तिचा स्वीकार केला म्हणून काय झालं? दिव्यगुणांनीं परिपूर्ण असत तिच्या मनोवृत्ति असतां क्षुल्लक भेदानें सुवासिक कलिका काय म्हणून दूर फेंकावी? आम्ही आमचा राजधर्म यथासांग पाळीत असतां त्या हालता-ल्याच्या हुलकावणीला जनता कशी वळते?

हाजि०—हांजी, कसली आली आहे जनता! येनकेन प्रकारेण आपली आपली मेहरनजर विमलादेवीकडे वळावी एवढ्याचकरितां हा सारा बागुल-बावा आहे, पण आपण कशाला कोणाची निंदा करा! बाकी रिकामा न्हावी भिंतीला तुंबड्या लावी!

वीरें०—बरोबर, तुम्ही म्हणतां तेंच खरं.

हाजि०—हांजी, उगाच नाहीं काळ्याचे पांढरे केले. अहो ज्याची खावी पोळी त्याची वाजवावी टाळी!

वीरें०—हाजिसिंग?

हाजि०—हांजी!

वीरें०—मला वाटतं जोंपर्यंत मी धर्मभ्रष्ट झालों नाहीं, ललितागौरीच्या अंतरगांत मला कांहीं किल्मिष दिसत नाहीं तोंपर्यंत—

( चंद्रकिशोर येतो. )

चंद०—प्रजापक्षाचा आदर करा !

वीरें०—किशोर, प्रजापक्षाच्या पिशाचानं तुलाहि पछाडलं वाटतं ?

चंद०—दादासाहेब, हें प्रजापक्षाचं पिशाच्च एका माझ्याच मानेवर बसून आपल्या सत्ताकरतां माझा बळी घेतं तर माझ्यासारखा धन्य मीच समजलों असतो. पण हें प्रजापक्षाचं पिशाच्च साऱ्या चितोडभर वांवरू लागलं आहे. प्रजेच्या उष्ण रक्तांत प्रवेश करून कारकिर्दीचा इतिहास उघडला आहे. योग्यवेळींच जर हें पिशाच्च शांत केलं नाहींत तर दारुण भवितव्यता माझ्या दृष्टिसमोर थैमान घालीत आहे.

वीरें०—किशोर, तूं शूराचा बच्चा आणि असला भेकडपणा ? या वीरेंद्रसिंहाच्या नसा आजच कांहीं शिथिल झाल्या नाहींत ! कट्यारीची धार अजून तुटली नाहीं मग कसली भवितव्यता ?

हाजि०—हांजी !

चंद०—दादासाहेब, आपल्या कट्यारीची धार मी कसा विसरेन ? पण—

वीरें०—बोल, हा वीरेंद्र दुष्मनांना जरी कर्दनकाळ असला तरी भाई चंदकिशोरला पित्यासमानच आहे.

हाजि०—हांजी.

चंद०—दादाजी, बाप्पाजींचे चरण स्मरण करून सांगतो कीं आपण पितृस्थानींच आहांत. माझ्या विनंतीचा, कौतुकाचा, हट्टाचा कधींहि अव्हेर केला नाहींत तेव्हां—

हाजि०—हांजी.

चंद०—एकवार मासाहेबांना आपल्या भेटीची आज्ञा द्या.

वीरें०—किशोर, विमलादेवीबरोबर जो मी विवाह लावला तो तिच्या पित्यानं केलेल्या माझ्या अपमानाचा बदला घेण्याकरताच ना ? ती जितराष्ट्राची कन्या ह्मणजे आमची वैरीण ! दूरदर्शीसत्तेनं जितराष्ट्राच्या एका छायाचित्रावरहि विश्वास ठेऊं नये. कधीं देहधारण करून विश्वासघात करील याचा नेम नाहीं.

चंद०—नका, त्या देवीला असा दोष लाऊं नका ! वाटल्यास ही कट्यार उचला व माझ्या छातींत खुपसा पण मासाहेबांच्या पावित्र्याला निंदूं नका !

वीरें—तूं बच्चा आहेस. पारतंत्र्यानें जखडलेल्या राष्ट्राचे डांवपेंच अझून तुला कळावयाचे आहेत. किशोर, विमलादेवी आपल्या सांप्रदायाचा अभिमान विसरली नाहीं. तिला आपल्या बापाच्या सूडाची जखम भरून काढायची आहे, तेव्हां तिच्याशीं जें आमचं वर्तन आहे तेंच योग्य आहे.

हाजि०—हांजी, आवडतीचं मीठ आळणी !

चंद०—दादाजी, माझ्यावर रागवा, मला दूर लोटा कीं काय वाटेल तें करा, पण मासाहेबांच्या दिव्य अंतःकरणाची आपल्याला पारख झाली नाहीं असंच मी ह्मणतों. मासाहेब आपल्या वैरिणी नसून आपल्या वैभवाच्या देवता आहेत. त्यांच्या दिव्य वृत्तीकडे आपण डोळेझांक केली आहे.

वीरें०—तिचा एक शब्दहि कानीं पडूं नये म्हणून तिचा वाडा मी दूर बांधविला आणि तूं मला माझा निश्चय सोडण्याचा आग्रह करतोस ! माझ्या भेटीची तिला का तहान लागली आहे ? कोणतं कारस्थान तिला साधायचं आहे ?

चंद०—भावीकालानें ज्या क्रांतिच्या उभारणीला हात घातला आहे त्या करतांच मासाहेबांना आपल्या भेटीची तळमळ लागली आहे.

वीरें०—कसली क्रांति ?

चंद०—महात्मा पंडित शिवशर्माजींना अटक केल्या दिवसापासून जनता खवळलेल्या महासागरासारखी प्रक्षुब्ध झाली आहे. सर्व वातावरण निषेधाच्या तिरस्कारानें व्यापून गेलं आहे. ललितागौरीच्या सैतानशाहीचा नाच चौंहिंकडे धिंगाणा घालूं लागल्यामुळें सारा चितोड जागा झाला आहे, मग सांगा, याहून राजक्रांतीची आणखी भवितव्यता कोणती ? दादासाहेब, यापुढं प्रजापक्षापुढं लक्ष दिलं नाहींत, पंडितजींची सुटका केली नाहींत तर—

वीरें०—ते माझा मार्ग अडवतील असंच ना ? पण किशोर या वीरेंद्रसिंहाचीं मनगटं प्रतिपक्षाचा प्रतिकार करण्या इतकी मजबूत आहेत. माझ्याविरुद्ध ब्र उच्चारणाऱ्या वाणीला जागच्याजागीं छाटून काढायला माझा अधिकार कोनाकोपऱ्यांतून वावरत आहे, यांत विमलादेवीच्या मध्यस्तीची जरूरत नाहीं व तिला भेटण्याची माझी इच्छा नाहीं.

चंद०—नका, माझ्या प्रेमाकरतां, हट्टाकरतां, या आपल्या लाडक्या किशोरकरतां तरी मासाहेबांना आपल्या भेटीची एकवार आशा द्या. त्यांचं म्हणणं ऐका. निरापराधी पंडितजींची मुक्तता करा.

१२ पद ( कॉफी—त्रिताल. )

द्यावा दयेला ठाव आतां । ती जाय असुखा दीना जनता ॥ धृ ॥
अस्ता न न्यावा तो धर्मभानू अवमान अनुचित जनमता ॥ १ ॥
गुरु दीव्य आधार पद पावन व्यसनीं न लोटा ठेवा समता ॥ २ ॥

वीरें०—( स्वगत ) कांहींतरी समजूत केली पाहिजे. ( उघड ) ऊठ, पंडितजींच्या सुटकेचा मी अवश्य विचार करीन आणि विमलादेवीलाहि भेटीचा योग आणीन. जा, उगाच मनाला तळमळ लाऊन घेऊं नकोस..

( दोघेहि जातात. )

हाजि०—म्हातारीनं कोंबडं झांकलं म्हणून तांबडं फुटायचं रहात नाहीं. पण आपण कशाला कोणाची निंदा करा !

( जातो. )

## प्रवेश ३ रा.

[ बगिचा. ]

( शामकुंवर येते. )

शाम०—

१३ पद—( लीलांवरी–केरवा. )

छळि हा विरह का मनाला । गरिब दीन बाला ॥ धृ० ॥
रुसवि मम मुखाला । सुचवी प्रेम कलह मजला । उदित
करि क्षणाला । मनिंच्या चपल भावनेला । मज शिकावि
प्रेमलीला । परि नाथ अदय झाला ॥ १ ॥

आळीव, कोकिले प्रेमाचे आलाप आणखी मधुर स्वरानं आळीव. प्रियवल्लभाच्या मधुमीलनानं हृदय विण्याच्या तारा जर स्वर्गीय गीत छेडूं लागल्या नाहींत तर बाई त्या प्रेमाला कशी बरं दिव्यता येईल ? काय ह्मणतेस, तुझा मला मत्सर वाटतो ? अहा ग वेडे, प्रेमाची भावना तूं इतकी का हीन समजतेस ? असेल बाई, वातावरणांत भराऱ्या मारणाऱ्या तुह्मां पक्षीकोटींत प्रेमाचं स्वरूप हिणकस असेल पण आह्मां आर्य तरूणींचं प्रेम दिव्य असतं बरं ! कोमल पुष्पांच्या अलंकारांनीं नटलेली ही लता पाहिलीस का-आपल्या वल्लभाच्या हृदयावर मान टाकून कशी आनंदानं डुलत आहे ? तशीच ही पूर्व दिशा आपला प्रियकर चंद्रमा लवकरच आपलं चुंबन घेणार म्हणून कशी हास्यमुख करूं लागली आहे. हा आनंदोत्सव पाहून वल्लभाच्या भेटीकरतां जरी आम्ही प्रेमोत्सुक होत असलों तरी दुसऱ्यांच्या मधुमीलनाकडे मत्सरानं पहात नसतों बरं ! काय म्हणतेस, माझा चांद लवकरच येणार म्हणून त्याच्या वाटेकडे दृष्टि लाऊं, खरंच ना पण हें ? माझी चेष्टा तर नाहींना ? हो प्रेमी हृदय प्रेमाला ओढून आणतं खरं, पण गडे हा चंद्रमा सृष्टिनियमांनीं पूर्व दिशेला अंकित झाल्यामुळं प्रेमपाश त्याला शिथिल करतां येत नाहींत. माझा प्रियकर माझ्या प्रेमबंधनांत जरी जख-

डला असला तरी वैवाहिक बंधनं नकोत का माझ्या आशेला उत्तेजित करायला ? जा बाई, मी काय आपली विरहिणी ! प्रेम विरहाचं हितगुज बोलायला जरी एखादी सहचारिणी लागते तरी तुझ्या सुखाचा मी कशाला भंग करूं ! तुझा प्रियकर तुझ्या सन्निध असल्यामुळें तूं जाशील तिकडे तुला स्वर्ग आहे पण मला माझ्या प्रियकराच्या वाटेकडे दृष्टि लाऊन अभिसारिका बनलंच पाहिजे—( रागानें ) काय ह्मणतेस, माझा प्रियकर माझा मनोभंग करणार आहे ? अग कवटाळणी, कर तोंड काळं ! उगाच मला राग आणूं नकोस, नाहिंपेक्षां हा माझा जंबिया—( जंबिया मारण्यास सरसावते तोंच चंदकिशोर येतो. )

**चंद॰**—हात खालीं का गेला ? रजपूत रमणीची कट्यार माघार घेत नसते.

**शाम॰**—महाराज, रजपूत रमणीची कट्यार निंदकांचं रक्त चाटायला जितकी अधिर असते तितकीच ती आपल्या प्रियकराच्या सत्वाला लीन असते.

**चंद॰**—तर मग त्या प्रियकराच्या सत्वाकरतां तिनं स्वार्थ–त्यागाला नको का तत्पर व्हायला ?

**शाम॰**—प्यारे, कोणता स्वार्थत्याग या दासीपासून आपण इच्छित आहांत ?

**चंद॰**—तुझ्यासारख्या सरल हृदय कुमारिकेनं प्रेमाच्या आनंदसरोवरांत विहार करणं हें शुद्धप्रेमाच्या शालीनतेला योग्यच आहे पण ज्यांच्या शिरावर थोर जबाबदारीचा भार येऊन पडला आहे त्या माझ्यासारख्या तरुणाला आधीं कर्तव्य कीं प्रेम ?

**शाम॰**—पतीला कर्तव्यभ्रष्ट करूं पहाणारी पतीच्या प्रेमाला तरी कशी पात्र होणार ? दांपत्यप्रेमाचं मंदिर कर्तव्याच्याच पायावर उभारलेलं असतं ना ? मग कर्तव्याला मी कशी पारखी होईन ?

चंद०—प्यारी शाम, या हृदयाची तूं किती अधिष्ठात्री देवता आहेस हें एक तो एकलिंगजीच जाणत आहे.

१४ पद ( शंकरा—त्रिताल. )

**गमे रमे विमला सुरबाला । आत्मबला उदिता**
**विराम मम ॥ धृ. ॥ गुंफिलि माला जिवा शिवाला**
**संसारी तूंचि यशाला हा मजला ॥ १ ॥**

तुझ्या हृदयाला दुःखाची नुसती कल्पनाहि शिवलेली मला सहन होणार नाहीं. पण काय करूं, माझं पवित्र कर्तव्य—

शाम०—बोला, ही शामकुंवर आपल्या मंगल सान्निध्याकरतां कितीजरी अधिर असली, धर्मपत्नीच्या अधिकारानं आपण माझा कधीं हात धराल या विचारांनीं तळमळत असली, प्रेमानं कधीं कुरवाळाल म्हणून विव्हल असली तरी आपल्या पवित्र कर्तव्याकरतां वाटेल तो स्वार्थत्याग करायला किंचित्‌हि माघार घेणार नाहीं.

चंद०—शाबास, तुझं अंतःकरण सतीला शोभण्यासारखंच सात्विक भावनांनीं भरलेलं आहे. प्यारी शाम, आपले भाईबंध राष्ट्रावर आलेल्या विपत्तींत चूर होऊन तळमळत पडले असतां प्रेमाच्या करपाशांत विलीन होणं तुला आवडेल काय ? आपल्या पवित्र धर्माच्या छलानं रंजल्यागांजलेल्यांचे आर्तस्वर कानीं पडत असतां लताकुंजाखालीं प्रणयाच्या गुजगोष्टी बोलत बसणं तुला आपलं कर्तव्य वाटेल काय ? हजारों राष्ट्रपुत्रांच्या रक्तानं प्राणापलिकडे जतन केलेली मायभूमीची इज्जत रावणी उन्मादानें भ्रष्ट होत असतां प्रेमविरहाचे संदेश या रजपूत बालेला भूषित करतील काय ?

शाम०—चंद्रबिंबापासून विकास पावणारी कमलिनी चंद्रदर्शनाचा मोह कसा आंवरील ? भेटीकरतां आपल्याला वरचेवर संदेश पाठविते, आपल्या दर्शनाकरितां अधिर होते—

**चंद०**—या रूपगुणसंपन्न मोहिनीचा स्वर्गीय आनंद कोणाला आवडणार नाहीं ? पण कर्तव्यापुढं प्रेमाचा मोह नको का कांहीं काल शिथिल करायला ?

**शाम०**—प्यारे किशोर, ही शाम जनदृष्ट्या जरी अजून आपली झाली नाहीं तरी मनानं हिला आपण अर्धांगीपद दिलं आहे मग अशी शंका का? बोला, असं आपलं कोणतं कर्तव्य आपल्या प्रेमाच्या आड येत आहे ?

**चंद०**—ललितागौरीच्या कुटिल संयोगानं दादासाहेबांच्या वृत्ति कशा पालटल्या आहेत त्या तूं जाणतच आहेस. पंडितजींना अन्यायानं अटक केल्यामुळं प्रजेच्या वतीनं थोर थोर प्रतिनिधी मासाहेबांकडे सारखे येत आहेत, पंडितजींच्या मुक्ततेकरतां सारी जनता खवळली आहे. धर्मरक्षण, धर्मरक्षण असें ह्मणत चितोडचा केसरी झेंडा त्वेषानें फडफडत आहे. मग सांग अशा अंदाधुंदीच्या, आणीबाणीच्या नाजुक परिस्थितींत आह्मां तरूणांना प्रेमविलासांत निर्बुद्ध होणं पुरुषार्थ होईल काय ?

**शाम०**—देशकार्याला प्रवृत्त होणाऱ्या कर्मवीराला कोणती आर्य स्त्री विरोध आणील ? धर्मपालन हेंच तर आह्मां आर्यांचं अंतिम ध्येय! पतीचा मार्ग हाच सतीचा जीवनमोक्ष आणि देशकल्याण हाच क्षत्रियांचा संसार ! त्या ईश्वरप्रणित आर्याश्रमाला ही आर्यकुमारी कशी विन्मुख होईल ? पण—

**चंद०**—कर्तव्यापुढं प्रेमाचा पण आंवरलाच पाहिजे.

**शाम०**—तो आंवरू नका असं मी कशी म्हणेन ? पण—

**चंद०**—पुनः पण ? शाम, सान्निध्यानं उद्भवणारी लोहचुंबकाची आकर्षणशक्ति त्याच्या विभक्तपणावांचून कुंठित होत नसते. हा चांद अंतरंगी जरी शाममय असला तरी याच्या देहावर असलेली कर्तव्यसत्ता पार पडल्यावांचून याला प्रेमाचा **अग्रहार** स्वकारतां येत नाहीं.

**शाम०**—तर मग शेवटीं या शामकुंवरचा आपण त्याग करणार ना ?

१५ पद ( झिंझोटी—कवाली. )

अनुराग का निमाला । अपराध काय झाला ।
मी दीन लीन अबला । का त्याग राग आला ।
चुकलि का दासि पाया । वनवास काय आला ॥ १ ॥

चंद्०—माझ्या हृदयाच्या या शक्तीचा मी कसा त्याग करीन ! धर्मभ्रष्ट करून प्रजा राजक्रांतीला प्रवृत्त करण्याचा जो ललितागौरीनें अट्टाहास चालविला आहे त्याचा बिमोड होईपर्यंत आपण प्रेमउदास राहिलं पाहिजे. नंतर हा किशोर माझ्या शामचा बंदा दास आहे.

शाम०—प्यारे किशोर, मी देखील आर्यकुमारी आहे. आपल्या इतकीच मला धर्माची चाड आहे. या उदय पावणाऱ्या चंद्राला साक्ष ठेवून वचन देतें—

१६ पद ( कॉफी झिंझोटी—त्रिवट )

देशास वाहीला प्राण हा ।
चंद्०—पावना सुरवरा विभवा गुणवाना धीरा वीरा ॥ धृ. ॥
शाम०—वासना भावना लोक कार्य सेवाया ।
लाविलि माना वुधा भ्रांति नसे या ॥
चंद्०—मंगल मय गणी जनपद सेवा ।
दावी जीवा प्रभुपाया साधित जनहित ॥ १ ॥

---

## प्रवेश ४ था.

[ महालांतील एक भाग. ]

( ललितागौरी व हाजिसिंग. )

ललिता०—एकूण सर्वांनीं एकच निर्धार केला ह्मणता ?

हाजि०—हांजी !

ललिता०—करा म्हणावं, आणखी आकाशपाताळ एक करून सोडा. ही ललितागौरी कच्चा दिलाची नाहीं. त्या थेरड्या पंडितजीलाच अटक करून कुठें थांबली आहे ? माझ्या सत्तेचा फाळ जेव्हां तुमच्या घरांदारांवर फिरूं लागेल तेव्हांच या ललितागौरीच्या कर्तबागारीची तुह्माला पारख होईल.

हाजि०—हांजी ! बिगारीच्या घोड्याला तरवडाचा फोंक पण जाऊं द्या ! आपण कशाला कोणाची निंदा करा.

ललिता०—हाजिसिंग ?

हाजि०—हांजी.

ललिता०—विमलादेवी प्रजेला सामील झाली असून तें कोंवळ्या रक्ताचं पोर तिच्या मागं नाचत आहे ह्मणतां ? नाच ह्मणावं किशोरजी, तुझ्यासारखीं छपन्न पोरं बोटावर नाचविण्याची जिच्या अंगांत करामत आहे, तिला तूं काय नाचविणार !

हाजि०—हांजी, सरकाराचा आज केवढा शह, अस्मानच्या शहाला हुकूम करतील तर नुसती नजर हालवायची त्याची ताकद नाहीं मग इतरांची काय शहामत ! माझ्या शामकुंवरचंहि डोकं त्यांनीं फिरविलं आहे.

ललिता०—आणखी कोणाकोणाचीं डोकीं फिरायचीं असतील तीं फिरूं द्या ! जोंपर्यंत राणाजी माझ्या नजरेच्या रोखावर फिरत आहेत तोंपर्यंत असले भुरटे माझ्याविरुद्ध कितीजरी थयथयाट घालूं लागले तरी सर्वांचे दांत घशाखालीं उतरायला मी खंबीर आहे.

हाजि०—हांजी, ही जगजाहीर जाहिरात आहे.

ललिता०—हांजिसिंग तुम्ही जा आणि चामुंडरायाला इकडे पाठवा.

हाजि०—हांजी !

ललिता०—पण हें पहा, विमलादेवीच्या हालचालीच्या बातम्या मला झटकन् मिळाल्या पाहिजेत अशी हेरांना सक्त ताकीद द्या. नाहिंपेक्षां माझ्याशीं गांठ आहे.

हाजि०—हांजी ! ( स्वगत ) उथळ पाण्याला खळखळ भारी.

( जातो. )

ललिता०—वीरेंद्रसिंहा, या जहाल नागिणीची तूं छेड काढिली आहेस, तिचं जालीम जहर तुला लवकरच कळेल !

( चामुंडराय येतो. )

चामुं०—सरकार, इतक्या तातडीनं बंद्याला का हुकूम झाला ?

ललिता०—चामुंडराव, आमात्याच्याजागीं जी मी तुमची बढती केली ती ऐषआरामांत लोळत पडण्याकरतां नसून ज्या अटीवर तुह्मी माझ्याशीं बांधले गेला आहांत ती अट आधीं पुरी करा मग बढतीच काय ही ललिता जहागिऱ्या बहाल करील !

चामुं०—मग बंद्याच्या हातून कोणती गफलत घडली आहे ? या पायाच्या सेवेकरतां भाईबंदावर कट्यार धरायला तयार झालों याहून बंद्याच्या इमानदारींत काय बाकी उरली आहे !

ललिता०—त्या थेरड्याला मी अटक करविली म्हणून प्रजा खवळली आहे मग तुमच्या नसांतील रक्त नको का खवळायला ?

चामुं०—तें न खवळायला काय कसूर झाली आहे ? चौंहिकडे गुप्त हेरांची टोळधाड पसरून जरब बसविण्याकरतां वाटेल त्याला गुन्हेगार ठरवून शिक्षा ठोठावीत आहे. आपल्या कटाला सामील होण्याकरतां आपआपसांत फंदफितुरी माजवून, नाहीं नाहीं ते आमिष दाखवून, खोटीं आश्वासनं देऊन बंद्यानें हुजुरांची नोकरी इमानें इतबारें चालविली आहे.

ललिता०—या चितोडची पातशायी वरपांगीं जरी राणाजींच्या हातीं असली तरी तिचीं सूत्रं चालविण्याची कुदरतीशक्ति या ललितागौरीच्या एका नजरेंत आहे. चामुंडराय, आपला कार्यभाग पार पडेपर्यंत हा आश्वासनाचा डोलारा टोलेजंग उभारा. ही ललितागौरी शांतताप्रिय व प्रजाहितकारी आहे असा जनतेंत विश्वास उत्पन्न करा आणि मधाचं पोळं असं पसरा कीं माशा एकामागून एक अडकल्याच पाहिजेत.

चामुं०—सरकार, राष्ट्राची लगाम मुत्सद्दीमंडळांच्या हातचलाखीवरच शाबूत टिकते. या शिवशर्म्यानें माझा अनेकवेळां अपमान केला आहे. राणी विमलादेवी मला हीन दर्जानें लेखीत आली आहे, तेव्हां या सर्वांचा बदला घेण्यासारखी सुसंधि या पायांच्या कृपेनं आली असतां ती मी कशी जाऊं देईन ? अपमानाचा सूड घेतलाच पाहिजे.

ललिता०—बेशक ! शीलाची घमेंड मारणाऱ्यांना भ्रष्ट शीलाच्या मनगटांत किती ताकद आहे ती पाहूं द्या. चामुंडराय, पंडितजींच्या सुटकेकरतां राणाजींची आर्जवं करण्याला विमलादेवीनं किशोरजीला पाठविलं होतं. तेव्हां जनमत काय आहे याची थोड्या बारकाईनं चवकशी करा आणि आपल्या पुढील धोरणाला जर कांहीं बाध येत असेल तर--

चामुं०—छे, छे ! सरकार असा उतावळेपणा कामाचा नाहीं. जनमताला जर आपण भिऊं लागलों तर जनमत प्रत्येक क्षणाला आपल्या मागें लागेल ह्मणून अशीच मूकवृत्ति ठेवा आणि अगदींच गळ्याशीं आलं तर सरकारांची मेहेरनजर जनतेच्या नजरेंत भरेल असा मोका पाहून पंडितजींची सुटका करा.

ललिता०—ठीक आहे. लगा तर आपल्या कामाला. ( चामुंडराय मुजरा करून जातो. ) हाडाकरतां लाळ घोटणारीं हीं कुलंगी कुत्रीं आहेत म्हणूनच आह्मासारख्यांचीं कारस्थानं बेगुमान पार पडतात. स्वतःच्या भाईबंदावर अंगार ठेवणारे हे बेवकूब दावणींत बांधून सुऱ्यानें छाटले पाहिजेत ! पंडितजी, तुह्मासारखा महात्मा ज्या राष्ट्राला लाभला तें राष्ट्र जिवंतच रहाणार. तुमच्याशीं जो मी विरोध चालविला आहे तो व्यक्तिद्वेषाकरतां नसून तत्त्वाकरतां आहे, पतीच्या खूनाचा सूड उगविण्याकरतां आहे, इज्जतीची जखम भरून काढण्याकरतां आहे. तुह्मी जर माझ्या पक्षाला येऊन मिळतां तर ही ललितागौरी आज सम्राट स्वामिणी झाली असती पण तुह्मासारखा महात्मा प्राणांतींहि सत्त्वाला ढळत नसतो. तुमचा

करारीपणा या ललितागौरीच्या अंगीं उतरो अशी परमेश्वराची मी करुणा भाकते.

---

अनुक्रम ९२८०९ (जाते.)
विभाग ७१
क्रमांक ७०८
नोंद. दि. ३०।७।५७

## प्रवेश ५ वा.

[ कारागृह. ]

( शिवशर्मा व किशोर. )

**शिव०**—बेटा, अन्यायानं राणाजींनीं मला अटक केली पण माझी आत्मशक्ति तर माझ्या निर्दोषपणाची साक्ष देत आहे ना ? मग एखाद्या मनोदुर्बलासारखी मी मनाची समता काय ह्मणून डळमळीत करावी ?

**चंद०**—महाशय, थोरांचं आचरण त्यांच्या मनोवृत्तीसारखंच थोर असतं. पण आपणासारखा सत्वधीर धर्मात्मा जनहितार्थ अशा वृद्धाप-काळीं अधर्मानं बंदिवास भोगीत असतां कोणाचं अंतःकरण थरारल्या-वांचून राहील ?

**शिव०**—हाच तर गौणमार्ग ! कोणतंहि सत्कार्य सुखाच्या शय्येवर लोळून घडत नसतं ! त्याला तारुण्य कीं वृद्धापकाळ काय, सर्व अवस्था सारख्याच. बेटा, ज्यांनीं स्वतःला जनकार्याला वाहून घेतलं आहे त्यांनीं देहिक बंधनं तोडून निःस्वार्थी, निस्पृहि व विदेही बनलं पाहिजे. केवळ शाब्दिक प्रदर्शन उघडून जनप्रवृत्ति उन्नत करतां येत नसते.

**चंद०**—थोरांची दानत हीच जनप्रवृत्तीची उन्नतावस्था; त्यांची निर-पेक्षबुद्धि हीच कर्तव्याची शिकवण आणि उदात्त निःस्वार्थ हाच लौकि-काचा कर्मसंन्यास !

**शिव०**—म्हणूनच कर्मसंन्यासी देहिक सुखाला किंवा लौकिकाला जुमानीत नसतो. त्याचा स्वार्थ, त्याचा आनंद, त्याचा संसार राष्ट्रधर्माचा विस्तार करण्याकडेच असतो.

चंद०—आणि ह्मणूनच त्याच्यावर आलेल्या प्रसंगानं जनता तळमळत असते.

शिव०—हा जनतेचा केवळ भ्रम होय ! जों जों प्रसंग अधिक येतील, घोर संकटं कोसळतील तों तों मनाची ओजस्विता प्रगट होऊं लागते. किशोरजी, माझ्याकरतां जर जनतेचं अंतःकरण कळवळत असेल तर या देहाच्या बाह्योपाधीकरतां तें तळमळूं देऊं नका. मी जो आश्रम स्थापिला आहे, ज्या राष्ट्रधर्माची चिकाटी धरली आहे त्याची जोपासना करण्याकडेच तुमच्या मनोभावना एकजीव करा; ह्मणजे माझ्या श्रमाचं तुह्मी चीज केलंत, या समाधानानें माझा आत्मा कोणत्याहि परिस्थितींत हर्षानें नाचूं लागेल.

चंद०—आपल्या ध्येयाची तीव्र जाणीव आमच्या आत्म्याशीं एकजीव झाल्यामुळेंच अन्यायाचा प्रतिकार करण्याकरतां आमची सारी धडपड चालू आहे. सूर्यासारखा एकच ग्रह पण चराचराला चैतन्य देतो. तोच जर राहूनें ग्रासला तर इतर असंख्यात तारका निकामीच ! सैन्याचा सेनानायक एकाच स्थलीं स्थिर असतो पण अधिकार असंख्यात घडामोडी घडवितो.

शिव०—त्या सेनानायकाची जर आपणाला कयर असेल तर मनाची समता मुळींच डळमळूं देऊं नका. सेनानायक कुठेंहि असो, त्याचा अधिकार त्याच्या इच्छाशक्तीनें समोंवार पडलेला असतो. सेनानायकाच्या संकटामुळं हातपाय गाळून मूळमुळ रडत बसून त्यानं आंखून दिलेल्या क्षेत्रांतील कर्तव्यें कशी पार पडणार ?

चंद०—पण ज्या धर्माच्या दिव्य तेजावर आमचं सत्व अवलंबून आहे तो धर्म जर मलिन होऊं लागला तर आम्हा तरुणांच्या मनोवृत्ति कशा शांत रहाणार ?

शिव०—प्रत्येक गोष्ट चांगल्याच करतां असते ही भावना जाग्रत ठेवून मार्ग चोखाळला पाहिजे. ईश्वर सत्याचा पाठिराखा आहे. सत्य हें



[अंक २ प्र. ७].

वीरेंद्रसिंह—चांडाळणी दूर !

त्याचें शील आहे. तुह्मी नेटानं, चिकाटीनं, एका दिलानं कार्याला लागा कीं, यश तुमच्या हाताचा मळ आहे. पण लक्षांत ठेवा, स्वैर मनोवृत्तींना बेहोष होऊन जर का अविचाराच्या तावडींत तुह्मी सांपडला तर तुमच्या॰ सारखे दुर्दैवी तुह्मीच !

चंद्०—आपला उपदेश असामान्य आहे.

शिव०—धर्मरक्षणार्थ निष्काम बुद्धीनें मी राजसत्तेला विरोध केला, म्हणून मला ही शिक्षा मिळाली पण माझ्या आत्मशक्तीला तर कोणी अटक करूं शकला नाहीं ना ? बेटा, राजसत्ता आज राणाजींच्या हातीं खेळत आहे. उद्यां तुझ्याहि हातीं जाईल. त्या राजसत्तेचा उपमर्द करणारे नीच प्रयत्न आजन्म मी केले नाहींत व करणार नाहीं. कायावाचामनें जी मी धडपड करीत आहे ती उरापोटाशीं जतन केलेल्या एका राष्ट्रधर्माकरतांच आहे. राजद्रोहाचा मला संपर्कहि घडलेला नाहीं.

चंद्०—ज्या आमच्या राजघराण्याचं नांव कानीं पडतांच क्षत्रियांच्या उज्वल चारित्र्याचा इतिहास दृष्टिपुढें उभा रहावा त्याच्या अंत्यपृष्ठावर दादासाहेब, आपल्या मलीन कारकीर्दीचा भेसूर लेख लिहिणार ना ? हाय ! आमच्या राजकुलाला डसलेला हा ललितागौरीचा राहू मलाहि लांछीत करणार !

शिव०—नाहीं, ज्याचा तोच आपल्या कर्मफलाचा अधिकारी असतो. राणाजींला काय वाटेल तें करूं दे पण तूं आपलं कर्तव्य विसरूं नकोस. परमेश्वर नानातऱ्हेचीं संकटें आणून परीक्षा घेत असतो. त्याच्या परिक्षेला उतरलास तर तो तुझा दास आहे व धर्म राष्ट्रोन्नतीचा सोपान आहे.

चंद्०—महाशय, आपल्या मुक्ततेकरतां मासाहेबांकडे सारखे लोक येत आहेत. मासाहेबांच्या वृत्ति अस्वस्थ झाल्या आहेत.

शिव०—राणी विमलादेवी सामान्य स्त्री नसून राष्ट्रोद्धाराकरतां महादेवी अवतीर्ण झाल्या आहेत. बेटा, रावण, बली, इत्यादि बलिष्ट राष्ट्रें

ज्या ज्या कालीं उन्मत्त होऊन धर्मभ्रष्ट केली गेलीं. त्या त्या वेळीं परमेश्वराला अवतार घेऊन त्यांचा नाश करावा लागला. हें अवतारकार्य परमेश्वर कालस्थिती प्रमाणें करीत असतो. ललितागौरीला आपल्या कारस्थानाचा चक्रव्यूह किती पसरायचा असेल तो पसरूं दे, सतीरूपानें अवतरणारी दिव्यशक्ति दुःशासनी सत्तेचा चुराडा केल्या वांचून रहाणार नाहीं.

चंद०—महात्म्यांची वाणी भविष्यकाळाची प्रस्तावनाच असते.

शिव० – बेटा, राणी विमलादेवीला व माझ्या देशबंधूंना माझा संदेश दे. त्यांना सांग कीं माझ्याकरतां कोणीहि दुःखी कष्टि होऊं नका. मी कुठेंहि कसल्या स्थितींत असलों तरी माझी इच्छा शक्ति तुमच्या सन्नीधच असणार आणि तुमच्या आचारविचारांत मला ती एकरूप करणार. धर्मरक्षणार्थ जी मी आजपर्यंत स्वदेशाची अल्पसेवा केली तीबद्दल जर मला कांहीं द्यायचं असेल तर धर्मपाळन या एकाच परितोषकाची मला भिक्षा घाला म्हणजे माझ्या मायदेशा या सर्व आपदा तो एकलिंगजी परिहार करील.

( पडदा. )

---

## प्रवेश ६ वा रस्ता.

( हाजिसिंग येतो. )

हाजि०—हांऽजी, कलीचा पाया जबरदस्त घुसला ! आतां कोणत्या तरी एका पक्षाला जमीनदोस्त केल्याबांचून पिछेहाट घेत नाहीं, पण फत्तेशाही कोणाची गाजणार ! ललितागौरीची कीं विमलादेवीची ?—ललितागौरीची म्हणावी तर तिच्या कटाला यावा तितका जोर दिसत नाहीं आणि विमलादेवीचा तर मुळीं कटच नाहीं. पण तमाम दुनिया तिच्या वर्तीनें विथरलेली तेव्हां आपण जे दुटप्पी धोरण ठेवलं आहे, तेंच अक्कलवंत आहे. ललितागौरीचा वरपक्ष झाला तरी ठीक आणि विमलादेवीचा झाला तर आहोंतच त्यांचे व्याही. अहो, करतां कसं, राजाराणीची

लष्ठालष्ठी तिकडे पक्षपाताची मगरमिठी म्हणजे बेकार सैटी ! भिकेची हंडी शिक्यावर चढत नसते. माझी शाम बिलकूल अक्कल-मंद ! तेजींमंदी तिला कांहींच कळत नाहीं. ललितागौरीचं नांव काढलं कीं ( पडद्याकडे पाहून ) पण हे रानबैल कोण येत आहेत ?

( दोन नागरीक येतात. )

१ ला०—खबरदार, पुनः जर एखादा वेडावांकडा शब्द उच्चाराल तर येथ या येथें जिव्हा छाटून काढीन.

२ रा०—अहो प्रजापक्ष, थोडे पंख आंखुडते घ्या. असे बेछुटपणानें वागलात तर पंडितजींच्या जोडीला जाऊन बसावें लागेल.

हाजि०—( स्वगत ) अस्सं, ही पक्षाभिमानाची जोडाजोडी ! पण आपण कशाला कोणाची निंदा करा !

१ ला०—निम्मकहराम ! एका कमअस्सल औरतीचा पक्ष घेऊन स्वतःच्या देशावर बेइमान होतोस ?

हाजि०—हांजी ?

२ रा०—काय म्हटलंत हाजिसिंग ?

हाजि०—छे, छे. आपण कशाला कोणाची निंदा करा म्हटलं अडला नारायण गाढवाचे पाय धरी !

१ ला०—पंडितजींच्या सुटके करतां पाठविलेले अर्ज नामंजुर झाले म्हणून सर्व प्रजा एकेरीवर आली आहे आणि अशा वेळीं हे देश बुडवे स्वतःच्या खळगीकरतां स्वाभिमान शून्यतेला बळी पडत आहेत. कोण दुर्धर अधोगति !

हाजि०—हांजि ! मी म्हणतो अशा दुहेरी डावांत सबसे चूप भला ! लोक काय दुतोंडी. जिकडे पिकेल तिकडे तुटायचे. मिळेल तिकडे पळायचे पण जाऊंद्या आपण कशाला कोणाची निंदा करा !

१ ला०—शाबास, नांवासारखेच पाजी दिसता ! धर्माभिमानाची तरी कांहीं चाड बाळगा !

२ रा०—हाजिसिंग, कोणत्या पक्षाला तुमची तयारी आहे ?

हाजि०—अहो कसला पक्ष घेऊन बसला आहांत ? कांहीं म्हणा तुम्हा तरुणांना धोरण कमीच. अहो उंदराच्या पोराला लोखंडाचे घास पचत नाहींत !

१ ला०—पण सिंहाला मत्त हत्तींचं मस्तक फोडल्यावांचून रहावत नाहीं.

हाजि०—भाई माफ करा ! त्या हत्तिसिंहाच्या टकरा साठमारीच्या मैदानांत. तुमच्या आमच्यांत नकोत !

२ रा०—हाजिसिंग, चामुंडरायाचा जितका मी हस्तक आहे, तितकेच तुम्ही ललितागौरीचे हेर आहांत.

हाजि०—हांजी !

२ रा०—तेव्हां ठरावाप्रमाणें या प्रजापक्षाची मुस्कटदाबी करा.

१ ला०—अहो अंधेरनगरीचे हेर, स्वतःच्या भाईबंदांची मुस्कटदाबी करतांना तोंडघशीची बक्षिसी घेऊं नका.

हाजि०—हांजी, रामनाम जपना पराइ माल अपना !

१ ला०—चूप रहा थेरड्या ! तुझ्यासारखे लाळघोटे आधीं कसाई-खान्यांत पाठविले पाहिजेत.

हाजि०—( रडवें तोंड करून ) हांजी !

२ रा०—हाजिसिंग !

हाजि०—हांजी !

२ रा०—यौरे गाजी !

हाजि०—हांजी !

२ ला०—अहो प्रजापक्ष, उगाच त्रागा करण्यांत मतलब नाहीं. निमुट-पणें आपल्या पक्षाला या व साधेल तितकं साधून घ्या.

हाजि०—हाजी. सत्तेपुढं शहाणपण नाहीं!

१ ला०—चल दूर हो थेरड्या !

हाजि०—( पडद्याकडे पाहून ) अहो पण हा तांडा कसला ?

१ ला०—देशबुडव्या, पंडितजींच्या मुक्ततेकरतां खवळलेल्या देशभक्तांचा !

२ रा०—( स्वगत ) होय का ? तर मग आपण पळ काढावा !

( जातो. )

१ ला०—ते पहा लोक मासाहेबांच्या वाड्याकडे वळले, चला देशबंधूनों, देशाच्या इभ्रतीकरतां जमीनअस्मान एक करून सोडा, सैतानशाहीचा नायनाट करा, सत्वाकरतां आत्मयज्ञ करा ! चला, दौडा एकलिंगजीकी जय !

( धांवत जातो. )

हाजि०—आतां आपण कुठंतरी दडी मारून बसावं, व अखेर साधावी ! हांजी ! मौन्यं सर्वस्य साधनम् !

( जातो. )

---

## प्रवेश—७ वा.—महाल.

( ललितागौरी. )

ललिता०—तर मग तुमच्या नसांत असेल तितकं रक्त आटवा, जोपर्यंत या ललितागौरीच्या उष्ण रक्तांत राणाजींना नाचवायची धमक आहे, तोंपर्यंत खूब याद राखून रहा कीं तुमच्या मुंड्या कैचींत पक्क्या अडकवीन तरच ही खरी मानी ललिता ! माझ्या अजिताचा युवराजाजोत्सव पार पडला नाहीं एवढ्या घमेंडीवर ताठ्यानें फुगूं नका. वाघीण स्वतःच्या इजतीपेक्षां आपल्या बचड्यांची छेड काढणारालाच फाडफाडून काढते. माझ्या दावणींतून राणाजींना सोडवायला जों जों तुह्मी कारस्थानं लढवाल तों तों माझे जालीम पाश राणाजीच्या कमरेभोंवतीं पसरले जातील मग

तुह्मीच काय, जमीन फाडून सैतान जरी वर आला तरी लाथेच्या ठोकरी-खालीं त्याला ठेचून काढीन ! एक डाव फसला म्हणून गुडघ्यांत डोकं खुपसून बसणारी ही ललिता नव्हे. जिनं राणाजीसारखा नरवीर आपल्या खुपसुरतीच्या जादूनं मारून टाकला ती तुह्मा मुर्दाडांना काय भीक घाल-णार ! जालीम अंगारानेंहि बेहोष न होण्याइतकी माझ्या नखऱ्याची आग राणाजीवर टाकून आज असा कांहीं डाव साधतें कीं चितोडच्या तक्तावर माझा अजित राजवैभवानीं डोलूं लागेल आणि तुह्मा सर्वांच्या माना माझ्या-पुढें वांकू लागतील. ( पडद्याकडे पाहून ) पण हें पहा, राणाजी आले. आपलं शस्त्र पाजळायला आरंभ करावा.

( सचिंत बसते. वीरेंद्रसिंह येतो. )

**वीरें०**—प्यारी लीला, आज कोणतं राज्य खालसा करायचा इतका गूढ विचार चालला आहे ?

**ललिता०**—राणाजी, आपल्या प्रेम राज्याहून मला आणखी कोणतं आलं आहे राज्य ! पण आपली प्रजा मात्र उगाच माझा हेवा करीत आहे. प्यारे, आपण माझ्यावर प्रेम करतां, यांत माझा काय बरं दोष ?

**वीरें०**—या अस्मानपरीवर प्रेम करूं नको अशी प्रत्यक्ष आकाशवाणी झाली तरी मीच काय, या महालांतील एखादी निर्जीव वस्तूहि समर्थ होणार नाहीं.

**ललिता०**—प्यारे, माझ्यामुळें आपली प्रजा जर इतकी नाराज होत आहे तर माझा का बरं त्याग करीत नाहीं ? आपल्या एका सुखावांचून मला कशाचीच चाड नाहीं.

**वीरें०**—वा, मग आह्माला लज्जत लावलेल्या तांबुलाची काय वाट.

**ललिता०**—माझ्या भ्रष्ट तांबुलाची ती कसली लज्जत ? पवित्र हाताचा तांबुल द्यायला आहेत आपल्या विमलाराणीसाहेब ! ( स्वतःशींच हसते. )

**वीरें०**—माफ कर ! तेवढ्या मलिन नांवाचा मात्र उच्चार करूं नकोस !

**ललिता०**—( थट्टेनें ) खरंच का आणि केव्हांपासून ? तरीच ह्मणतें अलिकडे ' विमलादेवी, विमलादेवी ' असा कानाजवळ सारखा गुंजारव करणारा हा धीट भ्रमर कोण ? बा, राणाजी आपल्या कमलिनीच्या कोशांत विलास करायचे टाकून दुसऱ्याचं का उगाच डोकं उठवावं ?

**वीरें०**—तुह्मां सुंदर स्त्रियांना कांहींतरी कलहाचे आलाप छेडल्यावांचून शृंगार रुचतच नाहीं ।

**ललिता०**—मला कसली आली आहे शृंगाराची रुची ! आपल्या राणीसाहेबांनी चांगलीच जाणत आहेत—का, तोंडसं फिरवलंत ? राग का आला ? खरंच, भ्रष्टवाणीनं उच्चारलेलं प्रियपत्नीचं नांव, कोणत्या पतिराजांना राग आणल्यावांचून राहील ? राणाजी, कसूर माफ करा. पुनः आपल्या राणीसाहेबांच्या नांवाला माझी भ्रष्ट जिव्हा कधींच विटाळ करणार नाहीं.

**वीरें०**—ललिता, आज तुझ्या मनांत आहे तरी काय ?

**ललिता०**—मनांत होय ? पहा पुनः कपाळावर तिरस्काराच्या आंठ्या चढल्या ! का कसा आहे प्रणयप्रभाव !

**वीरें०**—या वीरेंद्रसिंहाला आणि ललितागौरीचा तिरस्कार ह्मणजे चंद्रानें आपल्या कलेचा त्याग करून निस्तेज बनण्यासारखंच आहे.

**ललिता०**—पण त्या कलेचा नाश करायला जर राहूसारख्या अनिष्ट ग्रहांची तिच्यावर जहरी नजर असली तर ती कला कोठून टिकणार ?

**वीरें०**—ज्या कलेनें तो सर्व जगाला माधुर्य आणतो ती कला त्याच्या अंतरंगांत सांठलेली असते. अनिष्ट ग्रह असोत कीं शुभतारका त्याच्या स्वागताकरतां दीपोत्सव करोत, तो आपल्या कलेंतच एकरूप झालेला असतो.

**ललिता०**—पण माझ्या कमनशिबीं ही एकरूपता कोठून असणार ?

**वीरें०**—ललिता, या चितोडची सर्व सत्ता तुझ्या पायावर लोळत असतां अशी शंका का ?

**ललिता०**—माझ्या भोळ्या हृदयांत जर या आंधळ्या प्रेमाचा उदय व्हायचा होता तर दैवानं जन्मतांच हे पाय माझ्या का बर नशिबीं योजले नाहींत ? म्हणजे आज ही ललितागौरी राजमाता तरी झाली असती.

**वीरें०**—मग ती व्हायला काय बाकी उरली आहे ? परवाच्या बैठकींत अजिताच्या युवराजपदाची परिसमाप्ति झालीच आहे. आतां लवकरच राज्यारोहणाचा समारंभ जाहीर केला कीं माझी ललिता राजमाता झालीच !

**ललिता०**—खरंच, माझी एवढी हौस पुरवाल ना ?

**वीरें०**—माझ्या हृदयदेवतेची कोणती हौस हा वीरेंद्रसिंह पुरविणार नाहीं ?

**ललिता०**—माझ्या अजिताच्या आनंदोत्सवप्रसंगीं प्रजाभोजन द्यायची माझी फार इच्छा आहे. राजेसाहेब, मी नटून थटून प्रजाजनांकडून माझ्या अजिताला आशिर्वाद घेतांना कधीं पाहीन असं झालं आहे.

**वीरें०**—प्यारी, अशी घाई कां ? थोडे दिवस थांब, पंडितजीमुळें लोक थोडे नाराज झाले आहेत, तेव्हां—

**ललिता०**—आपण काय उत्तर देणार तें मी जाणून होतें. मीच वेडी ! गोड गोड थापांना भुरळतें अन् हवेंत उडूं लागतें !

**वीरें०**—किती तुझा हा उतावळा स्वभाव !

**ललिता०**—ह्मणूनच म्हणतें, का उगाच माझा त्रास सोसता ? जाऊं द्या मला आपली !

**वीरें०**—हें पहा, काय वाटेल तें बोल. रागाची कमान किती चढवायची असेल तितकी चढीव पण कांहींतरी अभद्र बोलूं नकोस.

**ललिता०**—तर तर. ओळखलं आपलं प्रेम ! ( दूर उभी राहते. )

**वीरें०**—चुकलों, राणीसरकार गुन्हा माफ ! आपली अट आम्हाला कबूल आहे. तहनाम्यावर मधुर चुंबनाचा मोर्तब करूं द्या. ( तिला जवळ ओढतो. )

**ललिता०**—( झिडकारून ) हं, खबरदार !

**वीरें०**—वाहवा, प्रेमाची खरी माधुरी स्त्रियांच्या हास्यवृत्तीपेक्षां रागानें फणफणाऱ्या चेहऱ्यावरच अधिक खुलते. काळ्या मेघांतून चमकणारी वीज—( विमलादेवी येते ) कोण, विमलादेवी ?

**ललिता०**—काय, ही हडळ माझ्या महालांत ?

**विमला०**—ललितागौरी, शांत हो. तुझ्या सुखाचा विरस करण्याकरतां मी आलें नसून त्या सुखाआड येणाऱ्या संकटांना दूर करण्याकरतां धांव घेतली आहे.

**वीरें०**—चांडाळणी, तुझें मुख दृष्टीस पडूं नये इतकेंच नव्हे तर तुझा एक शद्बहि कानीं पडूं नये म्हणून तुला राजवाड्यापासून दूर ठेवली मग मृत्यूच्या दारीं यायला का धजलीस ?

**विम०**—महाराज, पतीच्या हातून मृत्यू येण्यापेक्षां सतीला आणखी गती ती कोणती ? पण त्यापूर्वी माझे दोन शद्ब आपण शांतपणानें ऐकून घ्यावेत अशी चरणीं प्रार्थना करतें.

**वीरें०**—नाहीं, गुलामगिरीचं वेसण अडकविलेल्या व्यक्तीचा शद्ब आम्ही तृणसमान समजतों. आमचा हुकूम मोडून तूं आज आमचा शांतताभंग केलास याबद्दल तुला ललितागौरीच्या रोषाला बळीच जावें लागेल !

**ललिता०**—( स्वगत ) शस्त्र चालवायला चांगलाच डाव साधला. ( प्रकाश ) राजेसाहेब, शाबास ! खरे एकवचनी. डोळ्यांत चांगलीच धूळ फेंकलीत ! प्रजेकडून चालू असलेली माझी बदनामी अपुरी वाटल्यावरून आज राणीसाहेबांना आमंत्रण केलंत वाटतं ?

**वीरें०**—प्यारी, प्यारी हा काय गहजब ! ( विमलादेवीस ) चालती हो येथून !

**ललिता०**—राणीसाहेब माफ करा. राणाजींचा राग माझ्या आडकाठी मुळें आहे. आजपर्यंत मी आपल्या सुखांत कांटा होतें पण आतां तो दूर करतें.

**वीरें०**—ललिता—

**विमला०**—ललिता गौरी, भलत्याच गैरसमजुतीनें महाराजांच्या मनाला कष्ट देऊं नकोस ! पतिसेवेचा लाभ माझ्या दैवीं नाहीं म्हणून तुझ्या सुखाचा भंग करणारी ही विमलादेवी नाहीं.

**वीरें०**—मग कोणाच्या सुखाचा भंग करायला आली आहेस ?

**विमला०**—महाराज क्षमा करा ! आपल्या अखंड सुखभंगापेक्षां क्षणैक सुखभंग झालेला बरा म्हणून कर्तव्याकरतां धांव घेतली आहे.

**ललिता०**—कसल्या फुसक्या बाता झोडीत आहेस ! तुझा दिलदार जर तुला हवा असेल तर त्याला आपल्या महालांत ने व मिठ्या मार ! ही ललिता गौरी, कुलंगी कुत्री सारखी कोणाच्या पायांजवळ धांवत जात नसते.. अस्मानचा चांददेखील ही आपल्या पायाजवळ झुलविते.

**विमला०**—ललिता गौरी, चंचल सुखाकरतां मत्सराधीन होण्याइतकी मी क्षुद्र नाहीं. सुखापेक्षां सत्त्वाचीच मला विशेष चाड आहे.

**ललिता०**—बेशरम ! आपलं तकदीर फुटलं म्हणून दुसऱ्याचं कपाळ फोडणारी तूं सतीपणाच्या ढोंगांत मात्र बाकबगार आहेस खरी !

**विमला०**—स्वतःवरून दुसऱ्याची परीक्षा करावी यांत कांहीं नवल नाहीं गंगानदी हिमालयाच्या शैलाग्रीं जरी रहाते तरी तिचा ओघ समुद्राकडेच असतो. ओढ्यांना तिच्या गतीची काय कल्पना !

**वीरें०**—बस्स पुरे कर तुझी गतिकल्पना ! माझ्या ललिता गौरीच्या शांततेचा का उगाच भंग करीत आहेस ?

**विमला०**—महाराज, या विमला देवीला कोणाच्या शांततेचा भंग करायचा नाहीं किंवा सूडहि घ्यायचा नाहीं. पण ज्या आपल्या मंगल नांवाचा

उच्चार होतांच जनतेचं मस्तक पूज्यभावानं नम्र होत होतं, तीच जनता जर उलट दिशेला वाहूं लागली तर कोणती कुलस्त्री अशा प्रसंगीं स्वस्थ राहील?

**वीरें०**—ज्यानं तुझ्या बापासारखे रणमल्ल धुळींत लोळवून तुला आपल्या पायाची वटीक केली तो जनतेला काय जुमानणार ? त्या शिवशर्म्याला हातीं धरून जनला माझ्या विरूद्ध चिथावली आहेस तरी तुझ्या छातीवर पाय देऊन या ललितागौरीला मी राज्ञीपदावर बसविणार आहे. ही राजमाता आपल्या छाव्यांच्या मस्तकावर राजछत्र धरून तुम्हा सर्वांची चांगलीच रग जिरवील.

**विमला०**—काय आपण सत्त्वाला ढळणार ! महाराज—

**ललिता०**—होय. अजून खात्री करून घे ! ही स्वर्गसुंदरी मुखानें बडबडत नसते. कृतीनें हुकमत चालविते !

**विमला०**—असुरी माणसं आपल्या कृतीचं पर्यवसान यशांतच होत आहे अशा खोट्या कल्पनेंत नाचत असतात पण दैवीसत्ता त्यांचा ऐनरंगांत बिमोड करीत असते !

**ललिता०**—तुझ्या दैवी सत्तेंत जर कांहीं सामर्थ्य असतं तर या ललितागौरीपुढं मान वांकविण्याची तुला पाळीच आली नसती !

**विम०**—माझ्या दैवी सत्तेंत सामर्थ्य आहे म्हणूनच आज सोळा वर्षें तुझ्या कावेब्याापासून तिनें माझे सौभाग्य सुरक्षित ठेवलं पण आतां परिस्थिति पालटली आहे. यापुढें तुझा कोणताहि डाव सिद्धीला जाणार नाहीं.

**ललिता०**—राणाजी, पहाता काय, या हडळीला माझ्या समोरून काढा !

**वीरें०**—चांडाळणी, तुझ्या दैवीसत्तेचं चऱ्हाट पुरे कर व येथून चालती हो ! चंद्रापुढें हात धरून प्रकाश कमी होत नसतो.

**विम०**—तो होऊं नये एवढ्याकरतांच चरणीं लोळण घेतली आहे. महाराज, आपणाकरतां प्राणावर उदार होणारा जनसमाज आज खवळलेल्या महा-

सागरासारख्या क्षुब्ध झाला आहे. स्फटिकासारखं आपल्या ठिकाणीं असलेलं जनमत सर्पांच्या विखारासारखं विषारी झालं आहे म्हणून प्रार्थना करते कीं माझ्या बोलण्याकडे दुर्लक्ष्य करूं नका ! हिच्या कपटाला भुलूं नका !

**ललिता०**—ही हडळतर माझ्या कलिजाचे लचकेच तोडूं लागली ! राणाजी, धिक्कार असो तुमच्या ऐश्वर्याला ! या सैतानीनें माझ्या महालांत येऊन माझी इज्जत घेतली तरी तुम्ही स्वस्थ ! बस्स, तुमच्या प्रेमाचा मी इनकार करते !

( जाऊं लागते. तिला अडवितो. )

**वीरें०**—हट्, चांडाळणी दूर ! ( लाथ मारतो )

( पडदा पडतो. )

**अंक दुसरा समाप्त.**

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नं. दि.



# अंक तिसरा.

---

## प्रवेश १ ला–राजमार्ग.

( महात्मा शिवशर्माजीचा जयजयकार करीत नागरीक येतात. )

**नाग०**—महात्मा पंडित शिवशर्माजीकी जय ! हिंदमाताकी जय !! आर्यधर्मकी जय !!!

**शिव०**—महाजनहो, हा जयजयकाराचा समारंभ पुरे करा. माझ्या मायदेशाची जी मी सेवा करीत आहे, धर्मरक्षणार्थ जो अटोकाट हव्यास चालविला आहे, त्या करतां तुम्हीं माझे देव्हारे माजवावेत किंवा रस्तोरस्तीं पुतळें उभारावेत असली क्षुद्र इच्छा मी स्वप्नींहि धरली नाहीं. एखाद्यानें आपल्या देशाकरतां, धर्मा करतां किंवा समाजाकरतां थोड्या हालचाली केल्या म्हणून त्याच्या मेणामालखींतून वराती काढल्यानें कोणतं जनहित साधणार ?

**१ नाग०**—महाशय, आपणासारख्या महात्म्यांची सदिच्छा जनहिताकरतां जरी चोंहींकडे व्यापलेली असते तरी ती प्रवृत्त व्हायला जयजयकाराचा भेरीनाद आवश्यक नसतो काय ?

**शिव०**—असल्या लौकिक प्रदर्शनापेक्षां त्याच्या सांप्रदायाची कार्यदक्षताच त्याच्या आश्रमाला विशेष बळकटी आणते. लौकिकाच्या लालसेनं किंवा वैभवतृष्णेनं जर मी धर्मगुरूच्या ढोंगाखालीं दंभ माजविला असता तर तुमचं निरंकुश प्रेम माझ्या ठिकाणीं कधींहि जडलं नसतं, म्हणून सांगतों कीं, प्रेमानें प्रेम वाढवा, आत्मबलानें संघशक्ति वाढवा, व सत्यानें अत्याचाराचा प्रतिकार करा.

**सर्व**—धर्मगुरू पंडित शिवशर्माजीकी जय !

**शिव**०—महाजनहो, या विश्वाची उभारणी, चराचराची जुळवणी व जीवाभावाची मिळवणी धर्माच्या एका ओजस्वितेवरच अवलंबून असते. जिकडे धर्म तिकडे जय. कौरवासारखीं बलाढ्य राष्ट्रं एका धर्माच्या अभावामुळें अधोगतीला गेलीं पण तोच धर्मनिष्ठ पांडवांचा जयजयकार झाला.

**२ नाग**०—महाशय, या जिवाभावाच्या मिळवर्णांत राजसत्ता जर ढवळाढवळ करूं लागली तर धर्माची जोपासना कशी व्हावी? प्रजाहिताला पराङ्मुख होणाऱ्या सत्तेला ताळ्यावर आणायला कठोर साधनाखेरीज अन्य कोणता उपाय आहे?

**शिव**०—ज्या ज्या वेळीं राजसत्ता कर्तव्यहीन होते त्या त्या वेळीं कठोर मार्गाचा त्याग करून विवेक बुद्धीनेंच कार्याला लागलं पाहिजे, म्हणजे पाषाणहि दुभंग होतो.

**सर्व**—महात्मा पंडित शिवशर्माजीकी जय!

( ललितागौरी व चामुंडराय एका बाजूनें येतात. )

**ललिता**०—( रागानें ) कुणाचा जयजयकार करीत आहेत?

**चामुं**०—आणखी कुणाचा! थेरड्या धर्मगुरूचा. आपल्या दुष्मनाचा!

**ललिता**०—ठीक आहे. जरा आड व्हा.

( आड उभी रहातात. )

**शिव**०—महाजनहो, ललितागौरीच्या नादानं राणाजी आज बेताल झाले आहेत तरी आघातांना मागें परतविणारी आत्मशक्ति वाढवा कीं राजा व प्रजा यांच्या मनोवृत्ति एकरूप होतील.

**२ नाग**०—महाशय, महाराणी विमलादेवींनीं अभय दिल्याप्रमाणें आपली मुक्तता करविली पण—

( चंद्रकिशोर येतो. )

चंद०—पुढलंहि वचन मासाहेब लवकरच प्रत्ययाला आणून देतील.

शिव०—बेटा, सती विमलादेवीची माझ्या ठिकाणीं असलेली दृढभक्ति पाहून मला फार धन्यता वाटते.

चंद०—महाशय, आमच्या राजघराण्याच्या कल्याणार्थ प्रसंगाशीं आपण निरपेक्ष बुद्धीनें झगडत असतां आमच्या मनोवृत्ति जर आपल्या चरणीं लीन झाल्या नाहींत तर आमच्या कृतघ्नतेला सीमाच उरणार नाहीं.

१ नाग०—महाराणी विमलादेवीच्या पुण्यव्रत सांगतेकरतां परमेश्वरालहि अवतार घ्यावा लागेल.

चंद०—कालदेशानुसार परमेश्वर कसा अवतार घेतो याची साक्ष पंडितजींची कार्यदिशाच पटवीत आहे. पंडितजी बाह्यदृष्टीला जरी तुह्माआह्मासारखे भासत आहेत तरी ज्यांना हजारो आत्मे आपणाकडे ओढून घेण्याची शक्ति आहे ते ईश्वराहून इतर कोण असणार ! दृष्टीवरील पडदा दूर करा कीं भगवंताचें विशिष्ट स्वरूप दृश्यमान होईल.

सर्व—महात्मा पंडित शिवशर्माजीकी जय !

शिव०—चला, जो कार्यभार आपण शिरावर घेतला आहे त्या कर्मयोगाची पारायणें जनतेंच्या रोमरंध्री खिळविलीं पाहिजेत. करितां जनतारूपीं नारायणाला वंदन करून पुढील कार्याला लागूं या.

( मुलें पताका व हार घेऊन येतात व गळ्यांत घालतात. )

मुलें—महात्मा पंडित शिवशर्माजीकी जय !

१६ पद ( भैरवी—दादरा )

नमो गुरू देवा लोक कार्य सेवा ।
आनंद धामा बोधामृत द्या ठेवा ॥ धृ० ॥
तूंचि धर्मत्राता तूंचि राष्ट्रतरणी ।
तूंचि हिंद माता जिवाचा विसावा ॥ १ ॥

शिव०—मुलांनों, आजपर्यंत अनुभवला नाहीं इतका अपरिमित आनंद तुमच्या या स्वयंस्फूर्तीनें मला मिळाला. बाळांनों, माझ्या या मिरवणुकीकडे पाहून माझ्या नांवाच्या जयघोषाला भुरळून आपल्या कोमल बुद्धीवर विपरीत परिणाम करून घेऊं नका ! लोकमान्यता ही बाजारांत विकत मिळणारी चीज नव्हे किंवा सहेतुक साधनांनीं ती साधत नसते...निरपेक्षबुद्धि हीच कोणत्याहि कार्याची साधनशक्ति असते. धर्मनीतीच्या बलावर तुह्मी आपल्या कर्तव्याचा मार्ग चोखाळून देशभक्तीचा जरीपटका सुशोभित करा हाच तुह्मालां माझा आशिर्वाद आहे.

सर्व—धर्मगुरु पंडित शिवशर्माजीकी जय !

( पुनः पद ह्मणतात. जातात. दुसऱ्या बाजूनें ललितागौरी व चामुंडराय पुढें येतात. )

ललि०—तुरुंगांतील पाणी चाखून हा थेरडा वठणीला आला असेल अशी माझी समजूत होती पण पिंजऱ्याबाहेर येतांच लागला लोकमत चिथवायला !

चामुं०—तरी मी सांगत होतों पण सरकारांनी बंधाच्या विनंतीकडे लक्ष दिलं नाहीं त्याचाच हा परिणाम !

ललि० कसला परिणाम ! राणाजीसारखा नरकेसरी वांकवायला जिला एका पळाचा अवकाश लागला नाहीं ती या थेरड्याला काय भीक घालणार ! याचे तमाशे बंद करायला एका पळाचा अवकाश, कीं या ललितागौरीच्या करामतीचं पाणी दिसलंच ह्मणून समजा.

चामुं०—अलबत ! नाहिंपेक्षां इज्जतीची चाड ती कसली !

ललि०—बोला, नवीन भरणा किती झाला ?

चामुं०—पठाणांची भरती पांच हजारापर्यंत झाली आहे. कोळी, भिल्ल तीस हजारावर भरले आहेत. दहा हजार जुने शिपायी निकामी ठरवून बडतर्फ केले आहेत. आतां शिवशर्म्यासारखे छपन्न पागल लोकमत चिथवायला पैदा झाले तरी त्यांच्या तेथल्या तेथेंच ठिकऱ्या उडवून टाकूं.



चंदकिशोर—...आमच्या कृतघ्नतेला सीमाच उरणार नाहीं. [अंक ३ प्र. १]

लालि०—ठीक आहे ! आपला डाव पार पडेपर्यंत त्या थेरड्याच्या आणि विमलादेवीच्या भेटी होऊं देतां कामा नये आणि याला इलाज म्हणजे त्या अल्लड किशोरला जगांतून—बरं तुह्मी लागा आपल्या कामाला; गनीमि कावा मी चांगलाच दाखवितें.

( जातात. )

---

## प्रवेश २ रा—महाल.

( चंद्रकिशोर व अजित. )

चंद्र०—बेटा अजित, तुझा किंवा ललितागौरीचा आह्मीं काय ह्मणून द्वेष करावा ! आमचं भांडण व्यक्तिकरतां नसून तत्वाकरतां आहे. पवित्र-धर्माच्या जोपासनार्थ आहे.

**अजि०**—दादाजी, ज्या दिवशीं हा अजित सिंहाचा बच्चा नसून मा-साहेबांनीं सजविलेला दिखाऊ सिंह आहे, असं कळलं त्याच वेळीं माझ्या वृत्ति मावळल्या. व जें आपलं नाहीं तें प्राप्त करून घेण्याची अधम लालसा मी झुगारून दिली.

( गुढघे टेकतो. )

चंद्र०—तुझ्या कोमल मनावर आघात व्हावेत किंवा ललितागौरीची मानहानी करावी अशा हेतूनें एकवारहि माझ्या हातून कधीं प्रयत्न घडलेला नाहीं. दादासाहेब तुह्मावर वाटेल तितकं प्रेम करोत, तळहातावर नाचवोत कीं काय वाटेल तें करोत पण सत्वाला किंचितहि डळमळूं नयेत एवढ्याच-करतां आमची धडफड आहे.

**अजि०**—मग माझ्याविषयीं आपण का बरं परका भाव धरला आहांत ?

चंद्र०—या प्रकरणांत तूं किती जरी निर्दोष असलास तरी तुला युवराजपदाचा अभिषेक करायचा प्रयत्न झाल्यामुळें केवढा घोर प्रसंग ओढवला !

अजि०—दादासाहेब ज्या दिवशीं माझ्या जन्मरहस्याचा स्फोट झाला त्याचवेळीं जें आपलं नाहीं, कधीं नव्हतं व पुढें होणार नाहीं त्याची अधम लालसा मी पार झुगारून दिली. दादासाहेब, जुलमानें, सत्तेनें किंवा सक्तीनें विरोधीवृत्तीची सांगड जुळत नसते.

चंद०—अहा, बालपणाला न शोभणारे तुझे हे विचार ऐकून तूं मला अधिकच प्रिय वाटूं लागलास.

अजि०—भाई, अधर्मानें एका चितोडचीच काय पण साऱ्या दुनियेची पादशायी जरी पायाजवळ लोळत आली तरी हा अजित तिचा धिःक्कारच करील !

चंद०—शाबास !

अजि०—तो कुत्रा चामुंडराय खोट्यानाट्या गोष्टी सांगून मासाहेबांना सारखा चिथावीत आहे. त्याचे चांगलेच आज दांत पाडतो. मात्र आपण माझी पाठ राखली पाहिजे.

चंद०—आजपासून हा किशोर माझ्या अजिताचा सदैव पाठिराखा राहील.

(हाजिसिंग येतो.)

हाजि०—हांजी, आनंद आनंद हांऽऽ जी आनंद !

चंद०—कसला आनंद ?

हाजि०—हांजी, हा रामकृष्णाचा मिलाफ पाहून कोणाच्या आनंदाला ऊत येणार नाहीं ? ही अपूर्व संगमाची वार्ता ऐकून ललितागौरी खूष, खूष दिलखूष होणार !

अजि०—पण जिकडे दुभंगच नाहीं तिकडे कसला आला आहे मिलाफ आणि संगम ?

हाजि०—हांजी युवराज, हातच्या कांकणाला आरसा लागत नाहीं !

अजि०—पुरे करा हे मानसन्मानाचे अभिषेक! मी युवराज नाहीं व अधिराजहि नाहीं म्हणून हजारवेळां आपणास विनवून सांगितलं तरी पुनः पुनः खिजविण्यांत कोणता अर्थ!

हाजि०—छे, छे युवराज, इतरांना आपण कोणीहि असा पण आह्माला युवराजच आहांत. समर्थांच्या घरचें श्वान त्यास सर्वहि देती मान, खरं कीं नाहीं किशोरजी?

चंद—तें तुमचं तुह्मालाच ठाऊक पण आज माझ्या लाडक्या अजिताच्या अंतःकरणाची जी पारख झाली, तीवरून युवराजच काय त्याहूनहि थोर पदाला हा लायक आहे.

हाजि०—हांजी, गवयाचं पोर रडलं तरी तें सुरांतच रडणार! अहो कसले राग अन् द्वेष, आहेत चार दिवस खावं प्यावं सुखानं रहावं. कोणी पाहिली आहे उद्यांची घडी?

चंद०—पण आजची घडीतर पाहिली पाहिजे ना?

हाजि०—हांजी, तेवढ्याकरतांच तर आपला शोध करीत धांवत आलों. पाण्यांत काठी मारली म्हणून पाणी निराळं होत नसतं.

चंद०—म्हणजे?

हाजि०—वारा पाहून पाठ द्यावी, हांजी, ललितागौरीला कृतकर्माचा पश्चात्ताप झाला असून झाल्या—गेल्या गोष्टीबद्दल दिलसफाई करण्याकरतां त्यानीं आपणास पाचारण केलं आहे.

चंद०—कुणाला, मला?

हाजि०—हांजी, केवढा भाग्याचा दिवस! कोण त्याची उदारता! किती लोणकढी मन—हांजी—आतां माझ्या नेत्राचं सार्थक होणार.

अजि०—काय मासाहेबांच्या मनांतला द्वेष विझला?

हाजि०—हांजी, प्रभू कृपेनें आनंदी आनंद झाला आहे. युवराज आपल्या काकाजींना घेऊन मासाहेबांकडे चला. यांच्या भेटी करा. त्या अधिर झाल्या आहेत.

अजि०—अहा, परमेश्वरा ! त्रिभुवन जिंकून न मिळणारी धन्यता ह्या अजिताच्या भाग्याला आणशील काय ?

चंद०—आणील, तो अखिल विश्वाचा राजाधिराज सदिच्छेच्या वांट्याला धन्यताच आणील.

अजि०—मग चला, माझ्याबरोबर मासाहेबांकडे चला म्हणजे माझ्या बावरलेल्या मनाला स्थिरता येईल.

ह्याजि०—हांजी, तुरुत दान महा पुण्य !

चंद०—बरं तुह्मी व्हा पुढें. मासाहेबांचं दर्शन घेऊन मी तिकडेच येतो.

( दोघे मुजरे करून जातात. )

चंद०—खरंच का ललितागौरीचं मन पालटलं असेल ! वज्रमय शीलातलाला खरोखरच का कोमल रसाचा पाझर फुटला असेल. पंडितजींच्या खडतर तपश्चर्येचा खराच का पूर्णयोग आला असेल ! प्रभूजी हा कपिलाषष्ठीचा योग जर तूं आपण जुळवून आणला तर अखिल जनता तुमच्या लीलेचं कौतुक करील. (पडद्याकडे पाहून ) अहा, मनाच्या अशा द्विधावृत्तींत माझ्या प्रेमचंद्रिकेचं दर्शन घडणं म्हणजे मंगल शकुनच समजायचा. प्यारी शाम !

( शामकुंवर येते. )

शाम०—हें काय ? आपण प्रेमसंन्यासी मग हीं प्रेमकोशांतील विशेषणं कशाला ?

चंद०—लाडके, आपला प्रेमसंन्यास उदासीनतेचा नसून सान्निध्याचा आहे. व्रतफलापुरताच आहे. मग प्रेमाच्या भाषेला तो कसा पारखा होणार ?

शाम०—नाहीं ! पतीच्या ध्येयाकरतां हृदयाच्या कोमल भावना जरी कठोर झाल्या तरी पतीआज्ञेचे स्वर्गीय आलाप अणूमात्र बदसूर होता कामा नये.

चंद०—खरं आहे गुरूराज !

शाम०—स्त्रिया अधिर मनाच्या कोत्या बुद्धीच्या अशीं दूषणें द्यायला मात्र पुरुष एका पायावर तत्पर असतात पण प्रेमाचा मोह त्यांना क्षणभरहि आवरतां येत नाहीं !

चंद०—शुद्ध प्रेम हेंच या विश्वाचं मुळीं जीवन आहे. प्यारी शाम, आपला हा प्रेमसंन्यास आतां लवकरच संपणार.

शाम०—म्हणजे, मी नाहीं समजलें ?

चंद—अपूर्व गोष्टी जर आधीं कळल्या तर त्या अपूर्वच वाटल्या नसत्या. शाम, आज तुला एक आनंदाची खबर द्यायची आहे !

शाम०—प्यारे किशोर, आपल्या आनंदाची मी अर्धी वांटेकरीण असतां असा विलंब का ?

चंद०—ललितागौरीला, कृतकर्माचा पश्चात्ताप झाला असून सलोखा करण्याकरतां तिनं मला आज पाचारण केलं आहे.

शाम०—महाराज, यांत कांहींतरी कपट दिसतं ! आजपर्यंतच्या अनुभवावरून नागीण तिची छेड काढणाऱ्याच्या गळ्याभोंवतीं, प्रेमानें विळखा घालील हें विचारशक्तीलातरी पटतं का ?

चंद०—कां पटूं नये ? कोकिलेच्या बाह्यरंगाकडे पाहून तिच्या कंठांत माधुर्य भरलं असेल अशी कल्पनातरी होते का ? पण तीच पंचमस्वराचे आलाप छेडूं लागली कीं किती बरं मनाला आनंद देते ? अंतःकरणांतील नैसर्गिक भावना बाहेर पडायला परिस्थितीचं पाठबळ असावं लागतं.

शाम० आपल्यापुढें मी काय बोलणार ! पण कारस्थानीं माणसं हेतू साधण्याकरतां दांभिक प्रेमाचं जाळं पसरीत असतात. एवढं मात्र मला चांगलं कळतं, ह्मणून सांगतें ललितागौरीवर विश्वास टाकण्यापूर्वीं पूर्ण विचार करा. नागिणीवर अंधविश्वास टाकूं नका.

चंद०—भिऊं नकोस. विश्वासघाताचं प्रायश्चित द्यायला या किशोराचीं मनगटं मजबूत आहेत. ( जातो. )

शाम०—किती थोर मन ! इतक्या विनवण्या केल्या, काकुळतीनं सांगितलं, हट्ट धरला तरीदेखील किंचितहि मन वळलं नाहीं. देवा असल्या थोर हृदयाला किल्मिषाचा स्पर्श होत नसतो म्हणून आह्मा अबलांच्या वृत्ति अशा वीरांच्या चरणीं संलग्न होत असतात. ललितागौरीच्या महालांत जायला आतां कधींहि चुकणार नाहींत तेव्हां मला सावधच राहिलं पाहिजे.

### १८ पद. ( तिलककामोद–सारंग–केरवा. )

ध्यातें प्रभु तुला । द्याया यश मला ।
प्राणनाथ सदा सखा दयाळा निवाराया घोरकाला ॥ धृ. ॥
राजधर्म सारे त्यागी यशाला । सांडुनि शीला ।
घाला काळे हा मातला । या घोर काला ॥ १ ॥

( जाते. )

अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

---

## प्रवेश ३ रा —महाल.

( ललितागौरी व चंदकिशोर. )

ललिता०—किशोरजी, फाजील लोकांच्या चिथावणीनं तुह्मा सर्वांविषयीं मी गैरसमज करून घेतला होता पण आतां माझ्या मनाला खेद होत आहे.

चंद०—ललितागौरी, सारासार विचार न करतां आपण मध्यें जी ढवळाढवळ सुरू केलीत, तीमुळेंच आह्माला प्रतिकाराचं शस्त्र हातीं घ्यावं लागलं नाहिंपेक्षां आमचं वर्तन केव्हांही सरळंच असतं.

ललिता०—खरं आहे, तत्वाकरतां कोणीहि कठोर मार्गच स्वीकारला असता.

चंद०—कर्तव्याकरतां मानापमानाची चाड बाजूला ठेऊन मासाहेब याच महालांत प्रविष्ट झाल्या होत्या, त्यावेळीं घडूं नये अशी विटंबना झाली अस-

तांहि पंडितजींची मुक्तता होतांच त्यांच्या मनांतील सर्व रोष नाहींसा झाला.

ललिता०—नको, त्या कठोर प्रसंगाची आठवण देऊन मला लाजवूं नका.

चंद०—पण आतां खेद करण्यांत कोणता अर्थ!

ललिता०—किशोरजी, देवींनो एकवार भेटण्याची माझी फार इच्छा आहे.

चंद०—आपल्या भेटीपासून मासाहेबांना आनंदच होईल.

ललिता०—ती गुलाबाची नाजुक कलिका—का समजलांत ना म्हणतें आमच्या भावी राणीसाहेब, मुलीसारखं तुमच्या शामकुंवरवर माझं प्रेम, ती देखील माझ्यावर उलटली. आपलंच शिक्षण हें!

चंद०—सिंहाच्या छाव्याला शिक्षणाला जरूरत नसते!

ललि०—मग हाजिसिंग त्या छाव्याचे जन्मदाते ना?

चंद०—मनुष्य एकदां स्वार्थाचा गुलाम बनला कीं आंधळा होतो.

ललि०—शामकुंवर आपल्या पदरीं पडावी एवढ्याचकरतां बिचारे धडपड करीत आहेत. अशा वृद्धापकाळीं त्यांना आणखी दुसरा कोणता स्वार्थ असणार?

चंद०—पण स्वार्थाबरोबर सारासार विचार नको का करायला?

ललि०—बरं पण आमच्या स्वार्थाला कधीं यश आणणार? चंद्र चंद्रिकेचा मिलाफ एकदां कधीं दृष्टिला पडेल असं झालं आहे. पण तोंडसं फिरवलंत? अगदीं मनापासून नको असेल?

चंद०—असल्या नाजुक मिलाफाला हा चंदकिशोर अझुन उतावळा झालेला नाहीं.

ललि०—मग बिचाऱ्या शामकुंवरला निराश करणार कीं काय? भोळी बापडी जीवच सोडील!

चंद०—काय योगायोग असेल तो खरा.

ललि०—किशोरजी, माझी आपल्याला आणखी एक विनंति आहे. ऐकणं होईल तर सांगतें.

चंद्०—ललितागौरी, मानमरातबाच्या वाणीनें आळवून घ्यायची या किशोरला संवय नाहीं. काय असेल तें खुल्या दिलानें सांगा.

ललि०—माझा अजित माझा नसून आपलाच आहे असं मानून त्याला हातीं धरलंत कीं मी कृतार्थ झालें.

चंद्०—अजिताच्या थोर दिलाची आज मला साक्ष पटली आहे. त्या बालखीला मीच काय सारा चितोड हातीं धरायला राजी होईल. बरं आतां आपलीं रजा घेतो.

ललि०—थांबा, आपल्या शब्दावर माझा पूर्ण भरंवसा आहे तरी पण ( टेबलावरील पांचूचा पेला घेऊन ) आपण हंसा कीं मला वेडी समजा. मी आपल्याकरतां स्वतः उत्तम उत्तम द्राक्षाचा रस काढला आहे, त्याचा जर आपण स्वीकार केलात तर माझ्याविषयीं आपलं मन साफ झालं, अशी माझ्या भाझ्या भोळ्या मनाची समजूत पटेल.

चंद्०—( पेला घेऊन ) यांत एवढं संकट तें कसलं ? मोठ्या आनंदानें या मधुर रसाचा मी स्वीकार करतों. ( पेला मुखास लावतो तोंच शामकुंवर धांवत येऊन तो खालीं पाडते. )

शाम०—प्यारे, दगा !

( पेला खालीं पडतो. ललितागौरी खुनशी नजरेनें पहात रहाते. )

---

## प्रवेश ४ था—खोली.

( अंबिका येते. )

अंबि०—शर्थ झाली आतां यांच्या स्वभावाला. सारी प्रजा ललितागौरीच्या नांवानें लाखोल्या वाहत आहे आणि हे आपलें तिच्याच बाज्याकडे. राणाजींनीं तर अगदीं डोकीलाच गुंडाळलं आहे. त्या अवदसेच्या

नादानं धर्मगुरूचाहि छल करायला चुकले नाहींत. ( पडद्याकडे पाहून ) अगबाई पण हा गलबला कसला ?

( हांजिसिंग धापा टाकीत येतो. )

हांजि०—भडका, भडका, प्रचंड भडका !

अंबि०—अगबाई, पण असं थरथर कांपायला काय झालं ?

हांजि०—आग चेतवली, वणवा पेटला, ज्वाळा भडकल्या !

अंबि०—कुठं ?

हांजि०—असंगाशी संग आणि प्राणाशीं गांठ!

अंबि०—ती कशी ?

हांजि०—पण जाऊंद्या आपण कशाला कोणाची निंदा करा ?

अंबि०—छे बाई, सदान्‌कदा तुमचं मेलं नवलपरीचंच.

हांजि०—आतां कळेल कोणत्या परीचं तें. पण पांचहि बोटं-सारखीं नसतात.

अंबि०—अहो पण हे लोक दंगा करीत सुटले आहेत.

हांजि०—सुटायचेच. पण आपण कशाला कोणाची निंदा करा ?

अंबि०—या तुमच्या अचरटपणा, आतां म्हणूं तरी काय ?

हांजि०—कांहीं म्हणू नकोस. दाम करी काम आणि बिबी करी सलाम.

अंबि०—मरो ती बिबी ! ह्मातारचळ लागलं हो ह्मातारचळ लागलं.

हांजि०—आज ललितागौरीचा तळ बसला कीं कळेल बळाचं बळ !

अंबि—तें आणखी काय ?

हांजि०—अग आजपासून ललितागौरीचा अम्मल सुरू होणार म्हणून चौहींकडे हाहाकार उडाला आहे आणि तूं उंटावरून शेळ्या हांकीत बसली आहेत !

अंबि०—त्या मेल्या अवदसेचा तो कसला अम्मल ?

हांजि०—हं, हें राजकारण आहे, बायकांनीं आंत घुसूं नये. पण जाऊं द्या आपण कशाला कोणाची निंदा करा ?

अंबि०—मरो ती निंदा ! मीच आपली कुठंतरी निघून जातें.

हाजि०—आधी ललितागौरीचा इंगा फिरला आहे तो पहा ! अग वेडे आपली सत्ता चालावी असा ललितागौरीनें राणाजीकडून लेखी हुकूम घेतला आहे आणि तिचे लोक तिच्या सत्तेचा जाहिरनामा पुकारीत सुटले आहेत पण आपल्याला काय जेथें भरे डेरा तोच गांव बरा !

अंबि०—काय, त्या अवदसेचा अम्मल सुरू होणार ?

हाजि०—हांजी, आणि कोणाचा का होईना. लोक मूर्खासारखे बिथरले आहेत पण मला राणाजींचा व्याही व्हायचं आहे तेव्हां नवरा मरो कीं नवरी मरो भटाला दक्षिणेशीं प्रयोजन.

अंबि०—आग लावा तुमच्या दक्षणेला. माझी पोर जन्मभर कुवार राहिली तरी चालेल पण तुमची ही हाजिशाही नको.

हाजि०—मूर्ख आहेस. अग फुटका डोळा काजळानें साजरा करावा. अरे पण हे लोक तलवारी काय उपसूं लागले ? अग पळ पळ पळ तळघर गांठ..

( जातो. )

अंबि०—अरे देवा, काय हा प्रसंग !

( जाते. )

---

## प्रवेश ५ वा—महाल.

( ललितागौरी हातांत मुकुट घेऊन अजितासह येते. )

ललिता०—बेटा अजित, हें काय ? चितोडची पादशाही तुझ्या हातीं पडावी म्हणूनच ना मी हा सारा खटाटोप केला आणि ऐन वेळीं तूं मला धोका देणार ?

अजि०—माताजी, हजारो जणांच्या सुखांत माती कालवून आपल्या मलिन देणगीचा मी कोणत्या हातांनीं स्वीकार करूं ?

ललि०—आपल्या मातेची जर तुला कांहीं चाड असेल तर दैवानें

पाठविलेली ही सत्ता लाथेनं झुगारूं नकोस ! ईश्वरीइच्छेचा असा अनादर करूं नकोस !

अजि०—दुसऱ्यांच्या घरादारांवर नांगर फिरवून स्वतःची चैन उडवायला परमेश्वराची इच्छा ? मासाहेब, असल्या खोट्या मार्गाकडे बोट दाखविणारा परमेश्वर म्हणजे सैतानच असला पाहिजे.

ललि०—काय, परमेश्वराला तूं सैतान ह्मणूं लागलास ? आणखी थोड्या वेळानें मलाहि तूं सैतानी ह्मणूं लागशील ?

अजि०—क्षमा करा ! डोळे उघडे असतां माता म्हणून तिची सैतानी आज्ञा मी कशी मस्तकीं धारण करूं ? कोणता ईश्वर त्याला खूष होईल !

ललि०—पण मातेच्या इज्जतीकरतां तुला ती मानलीच पाहिजे. अजित, या हृदयाला किती जहर जखम लागली आहे तिची तुला कल्पनातरी आहे का ? आज बारा वर्षें झालीं, त्या जखमेचं एक छिद्रहि बुजालं नाहीं. त्या खूनाच्या प्रसंगाची एक पळहि या मेंदूतून आठवण गेली नाहीं, एक्या परस्त्रीचं सौंदर्य लुटण्याकरतां माझ्या पतीच्या कलेजांत घुसलेला तो जहरी खंजीर, दिनरात माझ्या दृष्टिसमोर थैमान घालीत आहे. सूड, सूड अशी सारखी गर्जना करीत झोंपेतहि मला हुसकावीत आहे, बेइज्जतीची जखम भरून काढ असा सारखा कानींकपाळीं टाहो फोडात आहे; मग सांग ही ललितागौरी सैतानी नसून सुलतानी आहे अशी नको का दुनियेची खात्री करून द्यायला !

अजि०—म्हणून एका व्यक्तीच्या सूडाचीं कडू फळं असंख्यांत जीवांनीं काय म्हणून चाखवीत ? कोणत्या ईश्वरी दरबारांत तो न्याय गणला जाईल ?

ललि०—तो अलम दुनियेचा शहानशहा जरूर या सूडाला न्यायाच्या कोंदणांत जडवील- अजित, नुकताच माझा एक डाव फसल्यामुळें आजच्या आज जर माझी सत्ता जगजाहीर झाली नाहीं तर या ललितागौरीचा नकशा उतरलाच म्हणून समज.

अजि०—नका, मासाहेब सूडाच्या राक्षसी तृष्णेला क्षणभरहि हृदयांत थारा देऊं नका ! या गरीब मुलाला सत्वापासून किंचित्हि खालीं ओढूं नका !

ललिता०—माझ्या पोटीं जर जन्मला असशील तर माझ्या इच्छेकरतां तरी तुला आज चितोडचा राजमुकुट धारण केलाच पाहिजे.

अजि०—पण चितोडचा हा राजमुकुट सुरक्षित बसण्याइतकं या अजितांचं मस्तक विशाल नाहीं मग औटघटकेच्या हौसेकरतां रक्तमासाचा चिखल तुडविण्यांत कोणता पुरुषार्थ ?

ललिता०—मातेचं मानी रक्त जर तुझ्या अंगांत खळखळत असतं तर आपल्या मातेची ही करामत पाहून तिला धन्यवादच दिले असतेस पण नेभळटांच्या ओंजळीनें पाणी चाखलेल्या तुला इज्जतीची काय चाड ?

अजि०—आपल्या इजतीचीच जर चाड पहायची असेल तर एखादा धर्ममार्ग दाखवा कीं सिंहाचा छावा किती शूर असतो याचा या घडीला अनुभव आणून देतो.

ललिता०—मातेला सांखळीनें जखडलेली पाहून सिंहाचा छावा कधींहि स्वस्थ बसणार नाहीं पण कोल्ह्याच्या अंगीं ती कोठून स्फूर्ति असणार !

अजि०—याहून कठोर शब्दांनीं जरी माझ्या हृदयावर घाव केलेत तरी असली सैतानी आज्ञा मी मुळींच जुमानणार नाहीं.

ललिता०—तर मग ती अस्सी जुमानायला लावणार. ( त्याच्यावर जंबिया उगारते. वीरेंद्रसिंह येऊन तिचा हात धरतो. )

वीरें०—ललिता, हें काय ?

ललिता०—इजतीचा बदला !

वीरें०—काय, स्वतःच्या मुलावर शस्त्र चालवून इजतीचा बदला ?

ललिता०—( जवळचा एक लखोटा दाखवून ) राणाजी, हें काय आहे तें ओळखतां ना ?

वीरें०—यांत काय ओळखायचं ! आज चोवीस तास तुझी सत्ता चालावी अशी तूं कौतुकानें मागणी केलीस व मी ती शिक्का मोर्तबासह अर्पण केली यांत काय ?

ललिता०—यांतच तर या ललितागौरीची करामत भरलेली आहे.

अजि०—बाप्पाजी, आज माताजी अनर्थ ओढविणार !

ललिता०—राणाजी, विमलादेवीनें प्रजा फितूर करून तुमचा नायनाट करण्यापर्यंत पाळी आणिली तरी तुह्मी घोरत पडलेले ! पण मी कशी स्वस्थ बसूं ? आज स्वतःच या कारस्थाला तक्तावर बसवून तुमच्या दुष्मनांची खबर घेणार आहे. हा दृष्टिपुढें तळपणारा प्रतापशाली सूर्य मध्यरेषेवर जाण्याचा अवकाश कीं चोहिंकडे या ललितागौरीचा अम्मल सुरू झालाच ह्मणून समजा.

वीरें०—ललिता, हें काय बडबडत आहेस ! तूं शुद्धीवर आहेस ना ?

ललिता०—चांगली शुद्धीवर आहे ह्मणूनच प्रतिपक्षाचा डाव ओळखून गनिमी शह बिनचूक बसविला. हं, असे दचकूं नका, ही ललितागौरी जिवंत असतां आपल्या एका केसालाहि धक्का लागणार नाहीं.

वीरें०—पण युक्तियुक्तीनें प्रतिपक्षाचे डाव हाणून पाडण्याऐवजीं अविचारानें अनर्थ माजविण्यांत कोणता अर्थ ! प्रजेला हातीं धरून विमलादेवी किती जरी अट्टाहास करीत असली तरी माझ्या सत्तेचा जोर इतका दुबळा नाहीं.

( पडद्यांत गलबला होतो. )

ललिता०—ऐका, माझ्या सत्तेचा डंका ऐका. राणाजी, या चातुर्याबद्दल माझी पाठ थोपटा.

अजि०—बाप्पाजी, ते पहा हातांत नग्न समशेरी घेऊन लोक चवताळले आहेत.

वीरें०—ललिता, हें काय केलंस ! हा तुझा अविचार ज़र मला पूर्वींच कळतां—

**ललिता०**—शाबास, शत्रू घरांत शिरून मानेवर तलवार ठेऊं लागला तरी त्याच्यावर विश्वास ! राणाजी, भिऊं नका, तुह्मी जरी यावेळीं नामर्द बनला असाल तरी ही ललितागौरी दुष्मनांची खबर घ्यायला खंबिर आहे.

( पुनः गलबला होतो. )

**वीर०**—ललिता, जा जा यावेळीं तूं आंत जा ! माझ्या नांवाचा पुकारा करीत लोक अगदीं जवळ आले. त्यांच्या दृष्टीला पडलीस तर ते तुझा खून करतील !

**ललिता०**—कोणता वीर या कुदरती शक्तीचा खून करायला आज समर्थ आहे ? दाखवा, एका ठोकरीतच त्याला चीत करते.

( शिवशर्मा, विमलादेवी वगैरे येतात. )

**शिव०**—नाहीं, ललितागौरी सत्त्याकरतां खवळलेल्या वृत्ति चीत करणं इतकं सुलभ नाहीं.

**ललिता०**—कोण, पंडितजी या. आतांतरी या ललितागौरीपुढें आपली मान बांकवा.

**विम०**—महाराज, हें काय केलंत !

**ललिता०**—विमलादेवी, एकावेळीं याच महालांत तुझा मी अपमान केला होता पण आज ही ललितागौरी चितोडची सत्ताधारीण आहे. ती आपल्या पाहुण्यांचा सन्मानच राखील.

**शिव०**—ललितागौरी, कालाच्या गतीबरोबर मनाच्या वृत्ति पालटत असतात पण तुझ्या तामसी स्वभावांत अजून किंचितहि पालट झाला नाहीं ना ?

**ललिता०**—पंडितजी, तुमच्यासारख्या फटिंग संन्याशाला मनोवृत्तीचे डावपेंच कसे कळणार !

**विम०**—महाराज, महासागरासारखा खवळलेला तो...समूह पहा, ललितागौरीच्या जाहिरनाम्यानें चिथाहून आपला संहार करण्याकरतां उद्युक्त

झाला आहे. एका पळाचा विलंब कराल तर आज ही प्रजा आपला नायनाट केल्यावांचून रहाणार नाहीं.

शिव०—वीरेंद्रसिंहा, असा कर्तव्यशून्य बनूं नकोस. ज्या नरश्रेष्ठांनीं या धर्मशील तक्ताच्या इभ्रतीकरतां आत्मयज्ञ करून सत्वाचा एक रजहि ढळूं दिला नाहीं तो या स्त्रीच्या नादानं विछिन्न करू नकोस.

ललिता०—यंवरे धर्मकपि !

शिव०—वीरेंद्रसिंहा, कसला विचार करतो आहेस ? माझ्याबरोबर चल व प्रजेला शांत कर.

ललिता०—पंडितजी, तुमच्या मानभावी कपटाला भुलून राणाजींना तुमच्या स्वाधीन करण्याइतकी मला भोळी का समजता ? छे, आतां आकाशांतून प्रत्यक्ष प्रलयकाल जरी खालीं उतरला तरी तुमचा डाव सिद्धीस नेण्याची त्याची मगदूर नाहीं.

विम०—महाराज, अजून विचार करा. ते पहा लोक अगदीं जवळ आले.

ललिता०—मग ही ललितागौरी कमकुवत समजतेस कीं काय ? पहा, माझ्या बिगुलाचा आवाज निघण्याचा अवकाश कीं हजारो नग्न समशेरी साऱ्या चितोडभर चमकूं लागतील.

विम०—ललितागौरी, अशी कठोर होऊं नकोस ! सत्वाकरतां तुझी जन्मभर दासी होऊन राहीन पण माझ्या सौभाग्यावर संकट आणूं नकोस.

वीरें०—चांडाळणी, एका हातानें पतीवर शस्त्र उगारून दुसऱ्या हातानें सतीपणाचा डंका पिटीत आहेस काय ? चल, चालतीहो येथून !

शिव०—अरेरे, जिच्या नुसत्या दर्शनानं पातकीहि उद्धारला जाईल त्या या राजलक्ष्मीची अवहेलना करून स्वतःचा अधःपात करीत आहेस ! श्रेण पुरुषा, आज रखेली पुत्राला तक्ताधिन करण्यासारखा अत्याचार करायल धजलास म्हणून तुझी प्रजा राजक्रांतीला प्रवृत्त झाली आहे. आज तुला ती जिवंत ठेवणार नाहीं, म्हणून सांगतो कीं सतीची अवज्ञा करूं नकोस !

वीरें०—पंडितजी, पुरे करा ही कोल्हेशायी ! या चांडाळणीच्या कथ-टाला भुलून माझ्याविरूद्ध प्रजा उठविली आहांत हें मी पूर्ण जाणून आहे. माझ्या ललितागौरीनें तुमचे डाव ओळखून जर मला सावध केलं नसतं तर हा वीरेंद्रसिंह तुमचीं हाडं चुरडायला उरलाच नसता.

शिव०—विषयांधा, हें काय बरळत आहेस !

अजि०—बाप्पाजी, हा सर्व अनर्थ एका माझ्याकरतांच ना ? पण अधर्मानें राज्याचा उपभोग घेण्याइतका हा अजित क्षुद्र नाहीं. मासाहेबांच्या राक्षसी देणगीचा मी धिक्कार करतो.

ललिता०—तुझं दैव जर फुटकं असेल तर त्याला मीतरी काय करणार ! ही ललिता स्वतःच राजदंड हातीं धरून दुष्मनांची रग जिरविणार.

अजि०—ही भूल आहे. ही चिमुकली तलवार पहा, हिच्यावर सत्याचं पाणी चढविल्यामुळें हजारो भ्रष्ट तलवारी जरी हिच्यावर कोसळून पडल्या तरी हिचं पातं किंचितहि लवणार नाहीं.

शिव०—शाबास, ललिता तुझ्याच उदरीं जन्म पावलेला हा हिरा पहा.

ललिता०—राणाजी, चला डोळ्याचं पातं लवतं न लवतं इतक्या अवधींत या ललितागौरीचे हजारो जवानमर्द यांना पाहूं द्या.

विम०—हृदय फाडून निघालेल्या एका आत्म्याच्या क्रोधापुढें ललिता-गौरी, पैशानें विकत घेतलेले तुझे भाडोत्री गुलाम निकामी आहेत.

ललिता०—माझे भाडोत्री गुलाम जरी निकामी असले तरी हा माझा सेना-नायक पहा. ह. नरसिंह पहा. ललितागौरीचा हा पाठिराखा पहा.

विम०—काय, महाराज आपण प्रजेवर शस्त्र उपसणार !

वीरें०—तुमचा प्रतिकार करणार.

( वीरेंद्र व ललिता जातात. हातांत नग्न समशेरी घेतलेली नागरीक बेफामवृत्तींत येतात. )



हांजिसिंग—हं, हें राजकारण आहे (अं० ३ प्र० ४)

१ ला०—कुठं आहे ती पापीण राक्षीण ?

२ रा०—कुठं आहे तो भ्रष्ट राणा ?

शिव०—प्रजाजनहो, शांत व्हा ! शांत व्हा ! !

१ ला०—महाशय, आमचा कोणीच पालक उरला नाहीं काय ?

शिव०—भिऊं नका ! हा तुमचा धर्मगुरू जिवंत असे पावेतों तुमच्या धर्मशील तत्त्वाचा एक रजहि ढळणार नाहीं. देवी !

विम०—महाशय, यावेळीं मी काय करूं ?

शिव०—क्षत्रिय पत्नीला योग्य तेंच कर.

विम०—काय, स्वामीवर शस्त्र धरूं !

शिव०—होय, सतीच्या उज्ज्वल तेजावरच राष्ट्राची इभ्रत आधारभूत असते. पति देशद्रोहि निघाला, धर्म भ्रष्ट वागूं लागला, देशबंधूनां विपत्तींत लोटूं लागला तर त्याची परोपरीनें कान उघडणी करून, सामदाम दाखवून प्रसंगीं जगांतून नाहिंसा करून शील राखणें हेंच क्षत्रिय पत्नीचं कर्तव्य आहे.

२ रा०—देवी, हातांत शस्त्र घ्या व धर्माचं रक्षण करा.

विम०—काय शस्त्र धरूं ?

शिव०—( शस्त्र देऊन ) होय, हें शस्त्र घे व आपलं तेज अमर कर. माझा तुला पूर्ण आशीर्वाद आहे.

विम०—प्रजाजनहो, ही पहा मी हातांत शस्त्र घेऊन पतिकर्तव्याला सिद्ध झालें.

शिव०—प्रजाजनहो, पहा रणदेवी सती विमलादेवीच्या रूपानें तुमचं सेनापत्य स्वीकारीत आहे. धर्माचा जय होणार ! चितोडची कीर्ति सांवरणार ! ! सतीचा जय होणार ! ! !

सर्व—महात्म्यांची वाणी सत्य ठरणार !

विम०—वीरहो चला, ती पहा ललितागौरीची सेना उधळली, तलवारी चमकूं लागल्या, धुळीचा लोट उसळला ! उपसा, तुमच्या इमाणी तलवारी उपसा व शत्रूवर असे तुटून पडा.

सर्व०—सती विमलादेवीकी जय !

( सर्व जातात. )

---

## प्रवेश ६ वा—रणमैदान.

( हाजिसिंग भ्यालेला असा येतो. )

हाजि०—अरे बापरे ! कुरुक्षेत्रांतीलच तो रणकल्लोळ ! हिमालयासारखा तो प्रचंड सेनासमूह पाहून छातीच फाटली ! आणखी थोडा वेळ तिकडे थांबतो तर बोबडीच वळती. पतिपत्नि युद्ध ! काय पण विमलादेवीच्या अंगांत वीरश्री संचारली आहे ! ललितागौरीचे पहाडी जवान पण राणीच्या तलवारी खालीं गवतासारखे कापले जात आहेत. राणाजींचा तर देवीपुढें टिकावच लागेनासा झाला आहे. बाकी आपण कशाला कोणाची निंदा करा ! माझ्यावरच गदा आली होती पण त्या धुमश्चक्रींतून यः पलायन केलं म्हणून बचावलों, नाहिंपेक्षां—( तोफांचे आवाज ) अरे बापरे ! आला कीं काय एखादा गोळा भेटीला ! या हत्तिसिंहाच्या टकरींत बिचारं कोंकरूं फुकट चिरडायचं ! माझी शाम किती छातीवान् ! युद्धाच्या बाता झोडण्यांत मी कधींहि हार घेतली नाहीं पण प्रसंग येतांच बोबडी वळली आणि ही शैली तलवार चमकवीत पण बापाची आहे कीं कोहीं दाद ? ( आवाज ) अबबबबब ! तोफांचा धूमधडाका तर आघाशा सारखा वाढत चालला. माझी तर वटवाघळासारखी स्थिति झाली आहे. समरांगणावर जावं तर तो तलवारीचा खणखणाट, रक्ताचा खळखळाट आणि कापाकापीचा सुळसुळाट डोळ्यापुढें काजवेच नाचवूं लागेल. शिवाय विमलादेवीच्या बाजूला जावं

तर एकीकडे आड व ललितागौरीकडे जावं तर दुसरीकडे विहीर मिळून दुतोंडी माणसाला तोंडघशीच पडावं लागतं. ( पडद्याकडे पाहून ) पण हें काय, युद्धाचा निकाल लागला कीं काय ? होयरे होय. ते पहा विमलादेवीचा जयजयकार करीत लोक हर्षानें नाचूं लागले. ललितागौरीचीं कुत्रीं धूम पळत सुटलीं आहेत. आमच्या शूर शिपायांनीं त्यांचा पाठलाग चालविला आहे. शाबासरे माझ्या भाईबंधानों, शाबासरे माझ्या मर्दानों, या या तुमचं स्वागत करण्याकरतां हा महावीर रणधीर गाजी हाजिसिंग छाती बसरून उभा आहे पण माझ्या स्वागताकरतां या रणदेवता कोण येत आहेत ! पण अगदींच शुभ्र कोरा कसा यांच्यापुढें जाऊं ? लपूनच पहाव्यात— ( बाजूला उभा रहातो. ललितागौरीचा पाठलाग करीत शामकुंवर व शिपायी येतात. )

शाम०—थांबा, पळूं नका. तुमच्या पक्या केसालाहि धक्का लागणार नाहीं.

ललिता०—काय, या ललितागौरीवर तूं हुकमत चालविणार !

शाम०—होय, दैवाचा फांसा चंचल असतो.

हाजि०—( एकीकडे ) शाबास मेरा बेटा. खरी या शूर हाजिसिंगाची पुत्री !

ललिता०—जिनं राणाजी सारखा नरसिंह शब्दावर नाचविला ती तुला हार जाणार ? वेडे पोरी मागं फीर. उगाच संकटांत उडी घालूं नकोस.

शाम०—ललितागौरी, तुमच्या असुरी वृत्तीनें अखेर तुम्हाला धूळ चारली तरी तुमचा ताठा अजून उतरला नाहीं ना !

ललिता०—कसा उतरणार ? पोरी, इज्जत ही स्त्री जातीला प्राणाहून प्यार असते. माझ्या पतीचा खून करून राणाजींनीं मला आपली

खेळी केली ! असल्या बेइज्जतीचा सूड घेतल्यावांचून कोणती स्त्री स्वस्थ राहील ?

शाम०—म्हणून एकाच्या पापाचं प्रायश्चित्त दुसऱ्यांना द्यायचं हा कोणता न्याय ?

ललिता०—हृदयाची जखम तुला काय कळणार !

शाम०—ती चांगली कळत आहे म्हणूनच विचारते तुम्ही जर खऱ्या होता तर आपलं शील कां राखलं नाहींत ? माझ्या सारखी तर अशा खडतर प्रसंगीं परपुरुषाचा हात दिसतांच खंजिराच्या शीडीनं पतिलोक गांठती.

हाजि०—( एकीकडे ) हांजी, खाण तशी माती.

शाम०—अजूनतरी ही तामसी वृत्ति सोडा व परमेश्वराची क्षमा मागा.

ललिता०—कसली क्षमा ! माझ्या सूडाच्या आगींत सर्व खाक झालं आहे. आतां ही ललितागौरी, एक मारील किंवा मरेल. चल दूर हो.

शाम०—नाहीं, युद्धाच्या नियमानुसार यावेळीं तुम्ही माझ्या कैदी आहांत.

ललिता०—ही ललितागौरी आणि कैदी काय ?

हाजी०—( एकिकडे ) कशी झाली गोगलगाय !

शाम०—ललितागौरी, निमुटपणें मासाहेबांकडे चला व त्यांची क्षमा मागा.

हाजि०—( पुढें येऊन ) हांजी, आमच्या राणीसाहेब फार दयाळू आहेत.

शाम०—कोण बाप्पाजी, तुम्ही इकडे कसे ? आणि अंगावर एकहि जखम नाहीं हें काय ?

हाजि०—बेटा, सारेच जखमांच्या नादीं लागलों असतो तर ही जात होती ना गुंगारा देऊन, म्हणून बसलों होतों टेहळणीवर !

ललिता०—अरे थेरड्या, पायांतील पैजार उचलतां उचलतां डोकीला घट्टे पडले आणि आतां दिमाख दाखवूं लागलास काय? तर मग हें घे बक्षीस—( त्यास जंभिया मारण्यास धांवते. )

शाम०—हं, खबरदार! करा हिला कैद!

( शिपाई कैद करतात. )

ललिता०—अरेरे या लुच्याच्या भरंवशावरच माझे सर्व बेत बाहेर फुटले, नाहिंपेक्षां ही ललितागौरी आज फत्तेमंद झाली असती. पण आतां दुष्मनांच्या हातीं जाण्याऐवजी ही अशी सुटणार—!

( जंभिया मारून घेते. पडदा पडतो. चंद्रकिशोर येतो. )

चंद्र०—अरेरे, एका असुरी वृत्तीच्या महत्त्वाकांक्षेनें केवढा प्रलय माजला! किती जीव जीवाला मुकले! रक्ताचे पाट वाहले, पतिव्रतांचा सौभाग्यमणि हरपला! इतकेंहि होऊन ललितागौरी शेवटीं तुझ्या अधम वासनेचा अधःपातच झाला!—अहा, मासाहेब, काय तें तुमचं शौर्य! वीरांगना हें नांव आपण सार्थ केलेंत! सर्वस्वी आमचा जय झाला.—पण अशा या आनंदोत्सवाच्यावेळीं माझ्या मनाला उद्विग्नता कां बरं वाटत आहे? मनाचा उत्साह का गळत आहे? कांहींतरी विपरीत प्रकार तर दृष्टीला पडणार नसेल ना! प्रभूजी आमचे कुलसंरक्षक आपणच आहांत.

१९ पद ( मालकंस—झपताला. )

प्रभुजी सदय तात। करुणामया वारि भय<br>
आपदा भ्रांत ॥ धृ ॥ अशुभा द्विधा भास। लागे<br>
मना ध्यास। न्या ताप आभास। हा लीन पदिं<br>
नाथ ॥ १ ॥

[ जातो. ]

---

## प्रवेश ७ वा—रणमैदान.

( जखमी झालेला वीरेंद्र विमलादेवीच्या अंकावर मस्तक ठेऊन पड-लेला दृष्टीस पडतो. )

वीरें०—विमल, देवी, प्राणवल्लभे—

विमला०—काय मी हें ऐकतें. पतिदेवा, ऐकवा पुनः पुनः ती गोड हांक ऐकवा ह्मणजे माझ्या दिव्य व्रताची सांगता होईल.

वीरें०—देवी, तुझ्या पवित्र अंकावरुन हें पापी मस्तक दूर ठेव. त्याच्या स्पर्शानं आपलं पावित्र्य दूषित करूं नकोस.

विम०—नाहीं नाथ ! पतीचा स्पर्श सतीला दूषित करीत नसून भूषि-तच करतो. तिचा उद्धार करतो. नाथ किती मी राक्षसीण ! प्रत्यक्ष पती-वर शस्त्र धरून हा घोर प्रसंग आणला !

वीरें०—क्षात्रधर्माला उचित असाच मार्ग तूं स्वीकारलास. विमल, य तुझ्या कर्तव्याची दिव्यता पतिव्रतांना खरोखरच आदर्शभूत होईल.

विम०—नाथ, आपल्या शरीराऐवजीं माझ्या हृदयावर जर हे शस्त्र-घाव पडते तर नसते का मी धन्य झालें !

वीरें०—नको, तुझे हे पवित्र अश्रू माझ्या अपवित्र देहावर ढाळून माझ्या उद्धारार्थ आपलं पुण्य खर्चूं नकोस. माझ्या सारख्या देशद्रोही, पत्नि-द्रोही, बंधूद्रोही दुरात्म्याला स्वर्गाचीं द्वारं मुक्त नाहींत.

विम०—नाहीं नाथ, आपल्या पुण्यार्थानंच चितोडचं सत्व रक्षण झालं.

वीरें०—देवी, माझ्या लांछित चारित्र्याचा विचार न करतां तूं गादीचं सत्व राखलंस. लाडके, कोणत्या अग्रहारानें मी तुझ्या दिव्यकर्तव्याचा गौरव करूं !

विम०—पतीच्या मुखांतील धन्यवादाच्या दोन गोड शब्दाखेरीज सतीला आणखी दिव्य कोणतं असणार ! आपली प्रेमाची हांक कानीं पडतांच पवि-



वीरेंद्रसिंह——ललिता हें काय ? ( अं. ३ प्र ५ )

सेवेकरतां तळमळणाऱ्या जीवाला स्वर्गसोपान मिळाला. पतिदेवा, प्रेमानं आपण माझ्याकडे दृष्टि लाविली आहांत, मायेनं माझं कौतुक करीत आहांत, मला आपल्या चरणाजवळ आश्रय दिला आहांत अशा या ब्रह्मसमाधींत जर मला मृत्यु आला तर माझ्यासारखी भाग्यवती एकतरी आढळेल का नाथ ! ( दचकून ) अगबाई, हा जखमेंतून रक्तस्राव किती जोरानें वाहूं लागला ( पदरानें पुसते. )

वीरें०—हाय, तुझ्या निष्कलंक हृदयावर मी किती आघात केले आहेत ! विमल, मला क्षमा करशील काय ? यमलोकीं नर्कवास भोगीत असतांना तुझी क्षमेची करुणामय दृष्टि मला दुःखाचा विसर पाडील, पितृलोकीं पितरांच्या क्रोधाची दारुण आग माझ्या हृदयाला जाळीत असतां ती ओलावा आणील. विमल, काय मी हें केलं !

विम०—नाहिंहो माझ्याच्यानें आपले हे दुःखालाप ऐकवत !

वीरें०—सर्व जन्मांत ज्यानें तुला सुखाचा एक शब्द दिला नाहीं तो अंतकाळीं तरी कोठून देणार ! विमल, माझं जीवित आतां फार थोड्या घटकेवर येऊन ठेपलं आहे, पण भिऊं नकोस !

विम०—माझ्या दुर्दैवानं जर तसाच प्रसंग ओढावला तर पतीचा चिर काल सहवास देणारा सहगमनाचा मार्ग मोकळा असतां मी कशाला भिऊं! महाराज, लग्नाच्या वेळीं आपला हात धरून जशी बोहल्यावर चढलें तोच हात मला स्वर्गीं नाहिं का बरोबर नेणार ?

वीरें०—माझ्याबरोबर तूं नरकांत येणार ?

विम०—पतिसन्निध असतां नर्क स्वर्गच भासतो नाथ ! ( दचकून ) अगबाई पण श्वास जोरानें काय वाहूं लागला ! माझ्याकडे अशी दृष्टि का लावलीत !

वीरें०—लाडके, मृत्यूनें मला आतां पूर्ण घेरलं आहे. यांतून मी आतां वाचणार नाहीं. पण त्यापूर्वीं माझ्या अंतःकरणांतील सांठा तुझ्या स्वाधीन

करतो तो माझा अंतकाळचा संदेश माझ्या प्रजेला कळीव, त्यांना सांग कीं तुमच्या तिरस्काराला पात्र झालेला हा वीरेंद्र आज मृत्यूंत विलीन झाला ! माझ्यासारखे जे दुरात्मे स्वतःच्या गृहलक्ष्मीला लाथाडून स्वैरगतीनें वाहात जातात त्यांना अंतीं हीच गति प्राप्त होते ! देवी, विमल हा तुझा पति तुझ्या पवित्र. अंकावर क्षमेची याचना करीत करीत—( प्राण सोडतो )

विम०—हाय, प्राणेश्वर ! [ पडदा पडतो. ]

---

## प्रवेश ८ वा—रस्ता.

( शिवशर्मा व नागरीक )

शिव०—शाबास, आजच्या विजयानं तुह्मी आपल्या धर्मतत्त्काचं नांव राखलंत.

१ ला०—महाशय, ही आपल्या आशीर्वादाचीच पुण्याई !

२ रा०—महाशय, स्वतःच्या राजावर शस्त्र धरून क्षात्रशीलाला आह्मी किती घोर कालिमा लावला !

शिव०—नाहीं, हा कालिमा नसून तुमच्या देशाभिमानाची जागती ज्योत आहे. राणा वीरेंद्रसिंहाच्या मृत्यूला तुह्मी कारणभूत नसून त्याचीं कर्म-फलंच कारण झालीं आहेत. कोणताहि राजा प्रजाहिताला विन्मुख झाला, धर्मक्रांति घडवूं लागला, प्रजेला निसत्व करूं लागला कीं त्याची दानतच त्याच्या नाशाला कारण होत असते.

३ रा०—महाशय, राणी विमलादेवी तर पतिसहगमनाला प्रवृत्त झाल्या आहेत तेव्हां आमचं तक्त राजमंडित झाल्यावांचून आम्ही कोणाचा आधार धरावा ?

शिव०—प्रजाजनहो, परंपरेनें गादीचा अधिकार कुमार चंद्रकिशोरकडे जरी येत असला तरी जो राजा प्रजापक्षाकडून निवडला जातो त्याचीच सत्ता प्रजाहितकारक असते.

१ ला०—महाराज, आमच्या राष्ट्राची चैतन्यशक्ति आपल्या एका शब्दांत भरलेली आहे. आपला आशीर्वाद हाच आमचा उत्कर्ष !

शिव०—प्रजाजनहो, राष्ट्राची प्रगति धर्माच्या तेजांत एकरूप झालेली असते. राष्ट्ररूपी शरिराचे अवयव किती निरोगी आहेत, जनतेची कर्तृत्वशक्ति व आत्मशुद्धि किती सोज्वळ आहे, हें अजमावण्याचं उत्तमांतील उत्तम साधन ह्मणजे धर्मजागृति ! त्या धर्मजागृतीच्या कसोटीस उतरून तुह्मी माझ्या श्रमाचं चीज केलंत. तुमचं राष्ट्र सदासर्वदा स्वातंत्र्य स्फुर्तीनें जिवंतच रहाणार !

२ रा०—महात्म्यांची वाणी भवितव्यतेची प्रभाच असते.

शिव०—प्रजाजनहो चला, सतीच्या सहगमनाला आनंदानें सम्मति द्या व किशोरजीची सत्ता मान्य करा.

सर्व —सती विमलादेवीकी जय !

( सर्व जातात. शामकुंवर येते. )

शाम०—अहा, मासाहेब आपल्या जयजयकाराचा हा मंगल ध्वनि आह्मा कुमारिकांच्या हृदयांत पातिव्रत्याची दिव्य ज्योत प्रदिप्त केल्यावांचून कसा राहील—

२० पद–( ललत—त्रिवट. )

नटला प्रभु तो पावना । दीन पतितजन सतितेजं हा ॥ धृ० ॥
फुलल्या सजल्या सकल दिशा या । सतियशवरदा गाया ॥ ॥

( जाते. )

---

## प्रवेश ९ वा—चिता.

( विमलादेवी सतीवेशानें परिवारासह. )

विमला०—किशोरजी, स्वामींना कर्तव्याची विस्मृति पडली म्हणून हातीं शस्त्र धरून प्रजाऋणांतून मुक्त झालें, आतां सतीधर्म नकोका पाळायला !

चंद्र०—मग हें राज्य कोणाकरितां ?

विम०—तुमच्याकरतां. तुह्मी आपल्या वंशाच्या कीर्तीला शोभेल अशा धर्ममार्गानें तें चालवा व सार्थ व्हा ! माझा तुह्मांला आशीर्वाद आहे.

शाम०—माताजी, या आपल्या लाडक्या शामला एकटीच सोडून जाणार ना !

विम०—शाम, माझे किशोर क्षत्रिय कुमार आहेत. ते कधींहि वचन-भंग होणार नाहींत. पतिचरणाचा एवढा भक्कम आधार असतां कुलशील आणखी कोणता आधार बेटा.

ह्याजि०—हांजी, पण देवी आपल्यावांचून तो कोण देणार ?

विम०—हाजिसिंग. जीवाभावाच्या एकीकरणाला दुसऱ्याचं सहाय्य लागत नसतं ! माझ्या पतिसङ्गमनाबरोबरच माझे किशोर सिंहासनारूढ होतील आणि शामकुंवरला आपली सङ्धर्म चारिणी करतील.

चंद्र०—नाहीं, माताजी या किशोरला राज्याची इच्छा नाहीं. आपल्या नांवानेंच राज्यकारभार चालवा. आपल्या सेवेंतच मी धन्यता मानतो.

विम०—बेटा, या राज्यावर माझा आतां कोणता हक्क उरला आहे ! माझं सिंहासन स्वामीच्या चरणाजवळ तयार आहे. स्वामींना सोडून जर मी परक्याचा संसार करीत राहिलें तर स्वर्ग देवता रुष्ट नाहीं का होणार ? चला हा मोह सोडा व मला द्यायला आज्ञा द्या !

शिव०—किशोरजी, सतीला पतीसङ्गमनापासून परावृत्त करणं क्षात्रधर्म नव्हे. आजचा हा पतिसङ्गमनाचा प्रसंग दुःखाचा नसून मंगलोत्सव आहे. राष्ट्राच्या उज्ज्वलतेचा दिव्य प्रकाश आहे. भारतीय रमणीच्या पावित्र्याचा आदर्श आहे. !

विम०—प्रजाजनहो, आजपर्यंत जशी माझ्या स्वामींच्या ठिकाणीं दृढ भक्ति ठेऊन गादीची सेवा मान्य केलीत, त्याप्रमाणें माझ्या किशोरजींना आपला राजा मानून प्रजाधर्म पाळाल एवढी मी याचना करतें.

नागरिक०—देवीची आज्ञा आह्मांला शिरसावंद्य आहे.

विम०—महाशय, आजपर्यंत जशी आह्मांवर कृपादृष्टि ठेऊन गादीच्या कल्याणाकरतां झटलात त्याचप्रमाणं माझ्या किशोरजीवर कृपाहस्त ठेवावा.

शिव०—देवी, या शिवशर्म्याच्या देहांत चैतन्य असे पावेतो या गादीच्या हितचिंतनांत देह झिजवीत अशी आपल्या चरणाला साक्ष ठेऊन शपथ वाहतो.

विम०—अहा, आतां मी निश्चित झालें. ( शामकुंरचा हात किशोरच्या हातांत देऊन ) किशोरजी, ही शक्ति मी तुमच्या स्वाधीन करीत आहे. हिच्या सहाय्यानें आपला राजधर्म यथासांग पाळून वंशाचं नांव राखा. एकलिंगजी तुमचा विजय करो. बेटा अजित—( त्यास जवळ देते. ) किशोरजी, अजिताला एक जहागिरी देऊन त्याचा संभाळ करा. ( चढत ) प्रजाजनहो, येतें मी माझ्याकरतां कोणीहि अश्रू ढाळूं नका ज्या भूमीनं तुह्माला अनेक जन्म दिला आहे तिच्या उद्धारार्थ जरी तुह्माला अनेक संकटें व हाल अपेष्टा भोगाव्या लागल्या स्वार्थाला मुकावं लागलं तरी स्वदेशाची चाड किंचितहि विसरूं नका. स्वदेशाची, स्वहक्काची, व स्वावलंबनाची जाडी भरडी भाकरीच राष्ट्रवीर निर्माण करते. महाशय, किशोरजी, शाम येतें मी. एकलिंगजी सर्वांचा विजय करो!

(चितेंत उडी टाकते.)

सर्व—महासती विमलादेवीकी जय!

शिव०—हाच राष्ट्राचा अग्रहार!

समाप्त.

नुक्र० ९४८०९ ७०८ दि० ३०।३।५३ ८०३४ ८१।२०